# थोडक्यात पण महत्वाचे



## ICSI कडून ई-व्होटिंगसह अनेक महत्त्वपूर्ण उपक्रमांची घोषणा

पुणे (स. गांवकरी) : द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया (ICSI) यांच्या 27व्या नॅशनल कॉन्फरन्स ऑफ प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीजचे उद्घाटन आज पुण्यात झाले. “Company Secretaries as Leaders: AI, ESG & Stewardship” या संकल्पनेवर आधारित दोन दिवसीय परिषदेत उद्योग क्षेत्रातील मान्यवर, वरिष्ठ कॉर्पोरेट व्यावसायिक आणि नियामक संस्थांचे अधिकारी सहभागी झाले आहेत. या प्रसंगी ICSI ने एक ऐतिहासिक घोषणा करत 2026 च्या निवडणुका पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार असल्याचे जाहीर केले. विशेष म्हणजे, कोणत्याही व्यावसायिक संस्थेकडून प्राधान्यक्रम मतदान (Preferential Voting) ऑनलाइन पद्धतीने घेण्याची ही जगातील पहिलीच वेळ असल्याचा दावा संस्थेने केला आहे. पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे अंशकालीन सदस्य प्रा. (डॉ.) गौरव वल्लभ यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील अनुपालन व्यवस्थेवर भाष्य करताना कंपनी सेक्रेटरीजना विश्वास, उत्तरदायित्व आणि सुशासनाचे प्रमुख घटक असल्याचे सांगितले. AI च्या जबाबदार वापरामुळेच भविष्यातील स्पर्धात्मक आघाडी निश्चित होईल, असे त्यांनी नमूद केले.

## ओतूर येथे कंटेनर व दुचाकीच्या अपघातात दोन ठार



ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील डुंबरवाडी हद्दीत अहिल्यानगर-कल्याण महामार्गावर शनिवारी दि. १३ रोजी रात्री ११.१५ च्या दरम्यान कंटेनर व दुचाकी यांच्यात झालेल्या जोरदार धडकेत दुचाकीवरील दोन्ही तरुणांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली असल्याची माहिती सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी दिली. याबाबत माहिती अशी की, शनिवारी रात्री ११.१५ वाजण्याच्या सुमारास डुंबरवाडी गावच्या हद्दीत अहिल्यानगर कल्याण महामार्गावरील किगा आईस्क्रीम शॉप समोरून आळेफाटा बाजूकडून ओतूरकडे जाणारी यामाहा दुचाकीवरून (एमएच १२, एक्सएल १३८०) प्रणव नितीन डुंबरे (वय २५, रा. ओतूर, ता. जुन्नर) व गणेश विजय गाडेकर (रा. डिंगोरे, ता. जुन्नर) हे येत होते त्याच वेळी कल्याण कडून अहिल्यानगर कडे जाणारा अशोक लेलँड कंपनीचा कंटेनर (एमएच ४६ डीसी २४५१) हाही चालला होता. यावेळी कंटेनर व दुचाकीमध्ये जोरदार धडक होऊन दुर्दैवी अपघात घडला असून त्यामध्ये दुचाकीवरील प्रणव नितीन डुंबरे व गणेश विजय गाडेकर यांचा जागीच मृत्यू झाला आहे. अपघात झाल्यानंतर कंटेनर चालक गणेश बाबासाहेब शिंदे (वय ३७, रा. हिवेसिंगा, ता. खोकारमोह, जि. बीड) याने सदर घटनेची माहिती पोलिसांना दिली. सदर अपघाताची माहिती मिळाल्यावर पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिस पथकाने अपघातग्रस्त वाहने महामार्गावरून बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. पुढील तपास पोलिस प्रशासन करत आहे.

## चांगला पाऊस पडु दे, बळीराजाच्या आयुष्यात सुख समाधान लाभू दे



ओतूर (स. गांवकरी) : राज्याच्या उपमुख्यमंत्री व पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी रविवार ता. १४ जून रोजी श्री क्षेत्र भिमाशंकर येथे भेट दिली. यावेळी त्यांनी शिवलिंगावर अभिषेक करून “राज्यात चांगला पाऊस पडु दे, बळीराजाच्या आयुष्यात सुख समाधान लाभू दे.” अशी भीमाशंकर चरणी प्रार्थना केली. यावेळी त्यांनी येथे सुरू असलेल्या विकास आराखड्याची पाहणी करून गुणवत्तापूर्ण व दर्जेदार कामे करण्याबाबत संबंधित यंत्रणांना स्पष्ट सूचना दिल्या. यावेळी माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील, खेडचे आमदार बाबाजी काळे, माजी आमदार दिलीप मोहिते, जुन्नरचे माजी आमदार अतुल बेनके, अप्पर जिल्हाधिकारी सतीश राऊत, भीमाशंकर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सुरेश कौदरे व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. पवार म्हणाल्या की, “भीमाशंकर विकास आराखड्याचे तीन टप्पे राबविण्यात येत आहेत. पहिल्या टप्प्यातील १४८ कोटी रुपयांची कामे पूर्ण झाली असून दुसऱ्या टप्प्यातील २८८ कोटी रुपयांच्या कामांना गती देण्यात आली असून श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे भाविकांसाठी पर्यावरणाचा समतोल राखत ६०० कोटी रुपयांहून अधिक निधीतून विविध विकासकामे करण्यात येणार आहेत.”

## रणरागिनीने शिक्षणासोबतच आत्मसंरक्षणाचे धडे गिरवावेत



रावेर (स. गांवकरी) : रायगड येथे शिवराज्याभिषेक च्या सोहळ्यानिमित्ताने संपूर्ण राज्यभरातून मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक करण्यासाठी विविध ग्रुप गेले होते यापैकी रावेर येथील रणरागिणी या ग्रुपला मानाचे स्थान मिळाल्याने , त्यांचा गौरव करण्यात आला यावेळी मर्दानी खेळ सादर करणाऱ्या विद्यार्थिनी यांनी शिक्षणासोबतच आत्मसंरक्षणाचे धडे शिकून , इतर महिलांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न करावेत असे मार्गदर्शन पोलीस उपविभागीय अधिकारी अनिल बडगुजर यांनी मनोगत व्यक्त करताना केले . रावेर येथील दत्तगुरु लॉन्स या ठिकाणी माऊली फाउंडेशनच्या वतीने आयोजित गौरव सोहळ्यात अध्यक्षस्थानी रावेर येथील परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी श्रीमती दीपा जेधे या प्रमुख पाहुणे म्हणून , पोलीस निरीक्षक डॉक्टर विशाल जयस्वाल तहसीलदार संजय तायडे प्रवीण पाटील आदि मान्यवर उपस्थित होते. सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन श्रीमती दीपा जेधे व डॉ सौ योगिता पाटील यांच्या हस्ते करण्यात आले तर सर्व रणरागिणी ग्रुपच्या पदाधिकारी यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. रावेर शहरात महात्मा फुले जयंती निमित्त सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांची प्रतिकृती साकारणाऱ्या स्वरा रवी महाजन व वेदांत संतोष पाटील यांचा देखील सत्कार करण्यात आला. प्रस्ताविकात माऊली फाउंडेशनचे अध्यक्ष डॉक्टर संदीप पाटील यांनी सांगितले की रायगडावरती आमंत्रित करण्यात आलेल्या रावेर तालुक्यातील मर्दानी खेळ सादर करणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींचा विशेष गौरव करणे आवश्यक वाटले तसेच या कार्यक्रमामुळे इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल. यात रायगडावर गेलेल्या नावे प्रशिक्षक-परी जीवन महाजन, कोच-जीवन सुभाष महाजन खेळाडूं खुश परदेसी, पवन जीवन महाजन सार्थक विनोद महाजन तेजस्विनी अंबादास महाजन चैताली विनोद शिंदे , मीनल संतोष महाजन , निशु ईश्वर महाजन ,खुशी कैलास महाजन , मृणाल ईश्वर महाजन यांच्यासह चिनावल शाखा चालवणारे-भावनाताई सरोदे ,अर्चना ताई सरोदे , युतिका नेमाडे , रसलपुर शाखा चालवणारे चैताली महाजन , वैष्णवी महाजन रीना चौधरी , यांचा देखील सत्कार करण्यात आला.

# विकासाचा दृष्टिकोन असणे महत्त्वाचे : सुजित झावरे पाटील

### देसवडे येथे १ कोटीच्या रस्ते कामांचे भूमिपूजन; पारनेर तालुक्यातील वाड्या-वस्त्यांवर रस्त्यांचे जाळे विणणार



पारनेर : (स. गांवकरी)

तालुक्याचा विकास साधायचा असेल तर विकासाचा दूरदृष्टीकोन असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पारनेर हा भौगोलिकदृष्ट्या अत्यंत मोठा तालुका असून, येथील शेतकऱ्यांना पावसाळ्याच्या दिवसांत शेतीमाल बाजारात नेण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागतो. हीच अडचण ओळखून पानंद रस्त्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम शिवसेना पक्ष खऱ्या अर्थाने करत आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांनी केले. पारनेर तालुक्यातील देसवडे येथे विविध योजनांतर्गत मंजूर झालेल्या सुमारे १ कोटी रुपयांच्या गावांतर्गत रस्त्यांच्या कामांचे भूमिपूजन सुजित झावरे पाटील आणि शिवसेना प्रवक्ते संजीव भोर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते.

पुढे बोलताना झावरे पाटील म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि रोजगार हमी योजना मंत्री ना. भरत गोगावले यांच्या माध्यमातून आमचे तरुण सहकारी संजीव भोर यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. त्यांच्या या प्रयत्नांमुळेच या विकासकामांसाठी १ कोटीचा निधी प्राप्त झाला आहे. पारनेर तालुक्यातील गावांचे क्षेत्रफळ मोठे असल्याने दळणवळणाचा प्रश्न गंभीर असतो. म्हणूनच, आगामी काळात तालुक्यातील सर्वच गावांमध्ये आणि वाडीवस्त्यांपर्यंत पक्के रस्ते पोहोचवण्यासाठी १०० कोटींहून अधिक निधी आणण्याचा आमचा मानस आहे.

या कार्यक्रमादरम्यान देसवडे परिसरातील अत्यंत महत्त्वाच्या रस्ते कामांचे भूमिपूजन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने गावांतर्गत पोखरी घाट ते टेकुडेवाडी रस्ता, सखाहरी फटांगरे घर ते जुंबर सोंड रस्ता, काळेवाडी रस्ता ते गुंड वस्ती रस्ता, काळेवाडी रस्ता ते कानडे वस्ती रस्ता आणि देसवडे ते सुतारदरा रस्ता या पाच प्रमुख रस्त्यांच्या कामांचा समावेश आहे. या रस्त्यांमुळे स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थांचा प्रवासाचा मोठा प्रश्न सुटणार आहे.

या विकासकामांच्या शुभारंभ प्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख अरुणराव ठाणगे, भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे अध्यक्ष संतोष वाडेकर, ज्येष्ठ नेते निजाम पटेल, माजी चेअरमन संजय भोर, भाऊसाहेब टेकुडे, सरपंच पोपट दरेकर, कारभारी टेकुडे, रावसाहेब फटांगरे, वैभव गुंड, अमीन पटेल, बाळासाहेब वाडेकर, रावसाहेब गोळे, राजू भोर, राहुल पारधी, देविदास टेकुडे, योगेश दाते, अविनाश भोर, अजित वाडेकर, शुभम टेकुडे, विशाल वाडेकर, उल्हास दरेकर, काशिनाथ गोळे, योगेश गुंड, सुनील कानडे, अजित भोर आणि नवले गुरुजी यांच्यासह परिसरातील युवक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या भागातील रखडलेले रस्ते मार्गी लागत असल्यामुळे देसवडे पंचक्रोशीतील नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

शिवसेना हा कार्यकर्त्यांना नेहमीच ताकद आणि बळ देणारा पक्ष आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्व सहकारी आता शहरांसोबतच ग्रामीण भागाच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रित करत आहोत. ग्रामीण भागातील प्रत्येक कानाकोपऱ्यात शिवसेनेचे संघटन आणि विचारांचे जाळे भक्कमपणे पसरवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

**- संजीव भोर (शिवसेना प्रवक्ते)**

पारनेर तालुक्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आम्ही प्रत्येक गावातील वाडी-वस्त्यांवरील रस्त्यांचा एक विशेष 'मास्टर प्लॅन' तयार करत आहोत. या रस्त्यांचे काम सध्या वेगाने सुरू असून, त्याला लवकरात लवकर मंजुरी मिळवून देण्यासाठी आणि आवश्यक तो निधी उपलब्ध करून घेण्यासाठी आम्ही शासन दरबारी सातत्याने प्रयत्नशील आहोत.

**- सुजितराव झावरे पाटील (माजी उपाध्यक्ष, जि. प.)**

## कोर्ट फी स्टॅम्पचा तुटवडा, अॅड. ऋषिकेश डुचे यांनी दिले निवेदन



जामखेड : (स. गांवकरी)

जामखेड तालुक्यातील सर्व मुद्रांक विक्रेत्यांनी २०० रुपये कोर्ट फी स्टॅम्प, ५ रुपये कोर्ट फी तसेच १० रुपयांचे तिकीट विक्रीसाठी उपलब्ध ठेवावेत, अशी मागणी जामखेड येथील अॅड. ऋषिकेश मोहनराव डुचे यांनी दुय्यम निबंधक तथा मुद्रांक निरीक्षक, जामखेड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, जामखेड तालुक्यातील सर्व मुद्रांक विक्रेते कोर्ट फी स्टॅम्प विक्रीसाठी तहसील अथवा कोर्ट आवारात ते उपलब्ध ठेवत नाहीत. शासनाच्या नियमानुसार मुद्रांक विक्रेत्यांनी सर्व प्रकारचे मुद्रांक विक्रीस ठेवणे आवश्यक असताना प्रत्यक्षात अनेक ठिकाणी कोर्ट फी स्टॅम्प उपलब्ध होत नसल्याची तक्रार आहे. जामखेड तहसीलच्या विविध शासकीय कार्यालयांमध्ये अर्ज व इतर कागदपत्रांच्या प्रक्रियेसाठी कोर्ट फी स्टॅम्प आवश्यक असतात. मात्र मुद्रांक विक्रेते हे स्टॅम्प विक्रीस ठेवत नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. काही विक्रेत्यांचे म्हणणे आहे की कोर्ट फी स्टॅम्प विक्री परवडत नाही. परंतु शासनाने त्यासाठी योग्य नफा निश्चित करून दिलेला असतानाही विक्रेते कोर्ट फी मुद्रांक विक्रीस ठेवत नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## अक्कलकोटमध्ये किराणा दुकानावर एफडीएचा छापा

### ६६ हजारांचा गुटखा जप्त; एफडीएने मोठ्या व्यापारी लोकांकडे केले दुर्लक्ष





अक्कलकोट : (स. गांवकरी)

अक्कलकोटमध्ये एका किराणा दुकानावर एफडीए ने छापा, टाकून केवळ 66 हजारांचा गुटखा जप्त केला खरा परंतु अक्कलकोट मधील होलसेल आणि बड्या गुटखा व्याकाऱ्यांवर कोणतीही कारवाई न करता त्यांना सही सलामत सोडले आहे यामुळे एफ डी ए ची कारवाई म्हणजे दिखावपणा असल्याची चर्चा अक्कलकोट मध्ये सुरू आहे. अक्कलकोट मध्ये गुटखा विक्री करणारे अनेक बडे व्यापारी आहेत हे बडे व्यापारी अक्कलकोट वागदरी, चपळगाव, सलगर, नागनसूर, तडवळ, जेऊर, पान मंगरूळ, करजगी करजाळ, वळसंग, दुधनी, मैंदगी येथे आहेत. या गावातील सर्व व्यापारी हे शेजार च्या कर्नाटक मधून मोठ्या प्रमाणात गुटखा आणून त्याचाअक्कलकोट तालुक्यातील दुकानदारांना पुरवठा करत असतात. असे असताना बड्या माशांना सोडून फक्त एक किरकोळ किरणां दुकानदारावर कारवाई करणे म्हणजे एफडी ची कारवाई किती संशयास्पद ठरत आहे अक्कलकोट मध्ये यापूर्वी दुकानावर छापे टाकून याचएफ डी ए च्या अधिकाऱ्यांनी सेटलमेंट करून तोडपाणी अनेक वेळा केलेली आहे मग आता देखील तोडपाणी करून बड्या व्यापाऱ्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे का ? असा सवाल उपस्थित केला जात आहे. एफ डी ए ने बडे व्यापारी लोकांकडे सहिसलामात दुर्लक्ष करणे म्हणजे मोठी खळबळ उडवणारी बाब असून या बाबत तुकाराम मुंढे यांच्या कडे तक्रार केली जाणार असल्याचे येथील काही सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रस्तुत प्रतिनिधी शी बोलताना स्पष्ट केले.

अक्कलकोट शहरातील खासबाग गल्ली परिसरात असलेल्या एका किराणा दुकानात प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांचा साठा आढळून आल्याने अन्न व औषध प्रशासनाने कारवाई केली. या कारवाईत ६६ हजार १२० रुपयांचा माल जप्त करण्यात आला असून संबंधित दुकानदाराविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी १२ जून रोजी दुपारच्या सुमारास खासबाग गल्ली येथील माउली किराणा स्टोअर्सची तपासणी केली. यावेळी राज्य शासनाने विक्रीस बंदी घातलेल्या विविध प्रकारच्या गुटखा, पानमसाला तसेच सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांचा साठा दुकानात ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाच्या सहायक आयुक्त कार्यालयातील उत्कर्षा मुकुंद एखंडे यांनी अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

त्यानुसार, आप्पासाहेब ग्यानबा धुमाळ (वय ५५, रा. खासबाग गल्ली, अक्कलकोट) यांच्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## राजगुरुनगर येथे खरीप हंगाम पूर्व नियोजन मार्गदर्शन

### बी.बी.एफ. या आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे पेरणी करण्याचे कृषी विभागाचे आवाहन



राजगुरुनगर : (स. गांवकरी)

आगामी खरीप हंगामात शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीऐवजी बी.बी.एफ. (रुंद सरी वरंभा पद्धत) या आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे पेरणी करावी, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवासाठी कृषी विभागाच्या वतीने "खरीप हंगाम पूर्व नियोजन मोहीम" राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत आधुनिक पद्धतीने पेरणी,प्रात्यक्षिके,कृषी मार्गदर्शन सुधारित बियाणे, खतांचे संतुलित व्यवस्थापन, पीक संरक्षण, तसेच जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. बदलत्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीत बदल करून पेरणीसाठी स्वतः बी.बी.एफ तंत्र तयार करून त्याद्वारे पेरणी करावी असे आवाहन कृषी विभागातर्फे करण्यात येत आहे. या बी.बी.एफ. तंत्रपद्धतीमध्ये रुंद वाफे आणि सऱ्या तयार करून पेरणी केली जाते. या तंत्रज्ञानामुळे पेरणी करताना बेड तयार होतो. व दोन्ही बाजूला सरी पडते.त्यामुळे पावसाचे अतिरिक्त पाणी सऱ्यांमधून निचरा होण्यास मदत होते, तसेच जमिनीत आवश्यक ओलावा टिकून राहतो. त्यामुळे पिकांची वाढ चांगली होऊन उत्पादनात वाढ होण्यास मदत मिळते.बाजारभाव आपल्या हातात नसले तरी उत्पादन खर्च कमी करून आर्थिक उन्नती साधता येते.

तसेच अतिवृष्टी किंवा अनियमित पावसाच्या परिस्थितीतही पिकांचे नुकसान कमी करण्यास या तंत्रज्ञानाचा फायदा होतो. तसेच पाणी, खत आणि मजुरी खर्चात बचत होऊन शेती अधिक फायदेशीर बनते खरीप हंगामातील पिके विशेषता सोयाबीन, तूर, हरभरा, मका यांसारख्या पिकांसाठी ही पद्धत उपयुक्त मानली जाते.खेड तालुक्यात १४ हजार ७०० हेक्टर क्षेत्रावर सोयाबीन पिके घेतली जातात.तर भात ७ हजार हेक्टर क्षेत्र,आणि मका ४ हजार ७०० इतके क्षेत्रावर खरीप हंगामात पिके घेतली जातात.जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी पाऊस लांबणीवर गेल्याने पेरणी देखील लांबणीवर जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.पावसाच्या आगमनापूर्वी खरीप हंगासाठी सज्ज राहण्याचे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

खरीप हंगाम पूर्वी शेतकरी बांधवांनी सोयाबीन बियाणे उगवण क्षमता तपासून जिवाणू संवर्धक बियाणे लाऊन बीज प्रकिया करावी.व बी.बी.एफ यंत्राद्वारे पेरणी करावी.

**- किरण कानडे-सहाय्यक कृषी अधिकारी,**

## यांत्रिक भात लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल; प्रो-ट्रे पेरणी प्रात्यक्षिक



पालघर : (स. गांवकरी)

जव्हार तालुक्यातील खरवंद येथील राऊत फार्महाऊसवर रविवारी (दि. १४ जून) प्रो-ट्रे भात लागवड (यांत्रिक भात लागवड) पद्धतीसाठी ट्रेमध्ये भात पेरणीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. भात लागवडीचा वाढता खर्च कमी करण्यासाठी आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी हे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. या पद्धतीत भाताची रोपे विशेष ट्रेमध्ये तयार केली जातात. त्यानंतर भात लावणी यंत्राच्या साहाय्याने लागवड केली जाते. त्यामुळे पारंपरिक पद्धतीतील राब करणे, रोपे उपटणे आणि पुनर्लागवडीसाठी लागणारा मोठा मजुरी खर्च वाचतो. परिणामी शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात लक्षणीय बचत होण्यास मदत होते. खरवंद येथील शेतकरी सदाशिव राऊत आणि बाळकृष्ण चौधरी हे मागील चार वर्षांपासून यांत्रिक भात लागवडीचा यशस्वी अवलंब करीत असून, या तंत्रज्ञानामुळे खर्चात बचत व कामात सुलभता मिळत असल्याचा त्यांचा अनुभव आहे. या उपक्रमासाठी कोसबाड येथील कृषी विज्ञान केंद्र, कोसबाडचे संशोधक भरत कुशारे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कृषी विज्ञान केंद्रामार्फत शेतकऱ्यांना प्रो-ट्रे उपलब्ध करून देण्यात आले असून भात लावणी यंत्राची सुविधाही उपलब्ध करून दिली जात आहे. दरम्यान, यंदा विनवळ येथील शेतकरी श्रीमती लता मोरघा आणि बबन मोरघा यांनीही प्रो-ट्रे यांत्रिक भात लागवडीचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला असून ते पेरणी प्रात्यक्षिकास उपस्थित होते.

# २५ वृक्षांचे वृक्षारोपण करून अनोखा संदेश देण्याचा प्रयत्न

### माणिकखांब येथे राबवण्यात आला वृक्षरोपणाचा उपक्रम



इगतपुरी : (स. गांवकरी)

गेल्या दोन ते तीन वर्षांपासून विकास कामांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल करण्यात आली. मोठ्या प्रमाणावर वृक्षतोडी झाल्यामुळे यावर्षी राज्यात उन्हाळ्यात ऊष्णतेचा पारा वाढल्याने नागरिकांना श्वास घेणे असह्य झाल्याचे पाहावयास मिळाले. सध्या जिकडे पाहावे तिकडे वृक्षतोड करून सिमेंटचे जंगल उभे राहिले आहे. त्यामुळे निसर्गाचा समतोल राखण्यासाठी झाडे लावणे किती महत्वाचे आहे हे आता मानवाच्या लक्षात आले आहे. याच पार्श्वभुमीवर इगतपुरीतील समाजसेवक संजय थोरात यांनी माणिकखांब ता.इगतपुरी येथे आपले वडिल सुरेश थोरात यांच्या २५ व्या स्मृतिदिनानिमित्त २५ वृक्षांचे वृक्षारोपण करून एक वेगळाच संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात भरपूर झाडे लाऊन त्यांचे संगोपन करावे असे मनोगत थोरात यांनी यावेळी व्यक्त केले.

सद्याची परिस्थिती पाहता वाढती उष्णता ही सर्वांसमोरची गंभीर समस्या आहे. यावर प्रभावी उपाय म्हणजे वृक्षारोपण. प्रत्येकाने झाडे लावून त्यांचे मनापासून संगोपन करावे व ती जगवावीत. पर्यावरण संवर्धनासाठी हा एक छोटासा पण महत्त्वाचा प्रयत्न आहे असे मनोगत बौद्धाचार्य मनोज मोरे यांनी वृक्षारोपण प्रसंगी व्यक्त केले. तर सामाजिक कार्यकर्ते एन. के. सोनवणे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, वृक्ष लागवड ही काळाची गरज आहे. झाडे मानवी जीवनाचा आणि पर्यावरणाचा मुख्य आधार आहेत. ती हवेतील कार्बन डायऑक्साइड शोषून घेऊन शुद्ध ऑक्सिजन देतात, ज्यामुळे हवामान बदल व प्रदूषणाचा सामना करणे शक्य होते. याशिवाय झाडे पाणी जमिनीत मुरवून जमिनीची धूप थांबवतात आणि जैवविविधतेचे रक्षण करतात. मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी हिरवीगार झाडे आणि निसर्गाच्या सानिध्यात राहिल्याने ताणतणाव कमी होतो. मानवी आरोग्यासाठी आणि आनंदी वातावरणासाठी झाडे अत्यंत फायदेशीर आहेत. त्यामुळे नागरिकांनी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करावे असा संदेश सामाजिक कार्यकर्ते भिमराव पंडित यांनी या प्रसंगी दिला. माणिकखांब येथे वृक्षारोपण प्रसंगी निसर्गप्रेमी बंटी पगारे,बौद्धाचार्य मनोज मोरे, सामाजिक कार्यकर्ते एन. के. सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते भिमराव पंडित, संजय थोरात, पोलीस पाटील उत्तम शिवराम पगारे, लोकराज्य प्राईम न्यूजचे संपादक सुनील पगारे, प्रतिक पगारे, चेतन पगारे, अनुराग पगारे आदी उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### शिवसैनिक ते वकील रोहिदास मुंडे यांची प्रेरणादायी शैक्षणिक वाटचाल

ठाणे (स. गांवकरी) : जिद्द, चिकाटी आणि शिक्षणाप्रती असलेली निष्ठा यांच्या जोरावर दिवा येथील सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असलेले अ‍ॅड. रोहिदास मुंडे यांनी कायद्याचे शिक्षण यशस्वीपणे पूर्ण करून आणखी एक मानाचा टप्पा गाठला आहे. मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या एम. एस. कॉलेज ऑफ लॉ, मुंब्रा येथे आयोजित पदवीदान समारंभात त्यांना बी.एल.एस. एल.एल.बी. पदवी प्रदान करण्यात आली. शिक्षण घेत असताना अनेकांनी त्यांच्या वयावर, जबाबदाऱ्यांवर आणि व्यस्त राजकीय-सामाजिक जीवनावरून टीका केली, काहींनी उपहासही केला. मात्र "शिक्षणाला वय नसते" हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवला. विविध सामाजिक प्रश्नांसाठी सातत्याने लढणारे रोहिदास मुंडे यांनी राजकीय व सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळत शिक्षण पूर्ण करून तरुणांसह सर्व समाजासाठी एक आदर्श निर्माण केला आहे. यावेळी बोलताना अ‍ॅड.रोहिदास मुंडे म्हणाले की, "जीवनात कोणत्याही वयात शिक्षण घेता येते. परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर यश मिळवता येते. माझ्यावर हसणाऱ्यांना मी शब्दांनी नव्हे, तर माझ्या शिक्षणातून आणि यशातून उत्तर दिले आहे." त्यांच्या या यशाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवर, सहकारी, मित्रपरिवार तसेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे."संघर्षातून घडलेले यश हेच खरे यश असते," याची प्रचिती अ‍ॅड.रोहिदास मुंडे यांच्या या प्रेरणादायी प्रवासातून पुन्हा एकदा आली आहे.



### निळवंडे येथे अवैध वाळूसाठ्यावर महसूल विभागाची कारवाई!

अकोले (स. गांवकरी) : अकोले तालुक्यातील प्रवरा परिसरातील निळवंडे येथील वडखास भागात अवैध वाळू उपसा व साठेबाजी प्रकरणी महसूल विभागाने कारवाई करत सुमारे १० ते १२ ब्रास वाळूसाठ्याचा पंचनामा करून संबंधित परिसर सील केला आहे. महसूल प्रशासनाला या भागात मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा सुरू असल्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. सर्वे क्रमांक ४२ परिसरात साठवून ठेवलेल्या वाळूची पाहणी करून अधिकाऱ्यांनी पंचनामा केला. विशेष म्हणजे या भागात कोणताही शासकीय वाळू लिलाव झालेला नसून घरकुल लाभार्थ्यांनाही वाळूचे वाटप करण्यात आलेले नसताना हा वाळूसाठा आढळून आल्याने संशय अधिक गडद झाला आहे. गेल्या काही दिवसांपासून निळवंडे व परिसरात अवैध वाळू उपसा, अवैध दारू व्यवसाय तसेच वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मागील दोन महिन्यांपासून अशा घटनांमध्ये वाढ झाल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. प्रवरा नदीपात्रालगत होत असलेल्या वाळू उपशाबाबत महसूल विभागाला पूर्वीपासून माहिती मिळत होती. त्यानुसार करण्यात आलेल्या कारवाईत हा वाळूसाठा उघडकीस आला आहे. आता या वाळूचा मालक कोण, वाळू नेमकी कोठून आणण्यात आली आणि यामागे कोणाचे जाळे कार्यरत आहे, याबाबत महसूल विभागाकडून पुढील चौकशी सुरू असून संबंधितांवर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



### बालाजी सेलुकर पाटील यांचे निधन

नवीन नांदेड (स. गांवकरी) : गोपाळचावडी (ता. जि. नांदेड) येथील जेष्ठ नागरिक बालाजी भाऊराव सेलुकर पाटील यांचे वयाच्या ६५ वर्षे त्यांचे राहते घर गोपाळचावडी येथे दि १४ जून रोजी पहाटे ३ च्या दरम्यान हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर रविवारी सायंकाळी ६ वाजता गोपाळचावडी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, एक मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे. बालाजी पाटील यांचा स्वभाव मनमोकळा व मनमिळावु असल्यामुळे त्यांना अचानक हृदय विकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाल्या बद्दल गावातील अनेक जेष्ठ नागरीकांसह ग्रामस्थांनी दुख व्यक्त केला जात होता त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, एक मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे ते गोपाळचावडी येथील ग्राम पंचायतचे उपसरपंच साहेबराव सेलूकर पाटील यांचे ते वडील होते.

### हदगाव तालुक्यात अनेक ग्रामपंचायतींमध्ये ओबीसींसाठी एकही जागा नाही

तामसा (स. गांवकरी) : राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभागनिहाय आरक्षण सोडत जाहीर केली. त्यात लोकसंख्येनुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती ५० टक्के व सर्वसाधारणसाठी ५० टक्के आरक्षण मर्यादेच्या अटीमुळे हदगाव तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गासाठी एकही जागा राखीव राहिलेली नाही.



ठाणे : दिवा शहरातील स्टेशन जवळील साबेगाव रोडवरील आंबेडकरी समाजाचा क्रांतीस्तंभ अनधिकृत पार्किंगमध्ये हरवला आहे. सदर ठिकाणी अनधिकृत रिक्षा व चारचाकी गाड्यांचे पार्किंग होत असल्याने आंबेडकरी समाजातील अनेक जेष्ठ नागरिकांनी खेद व्यक्त केला आहे.

(फोटो - संतोष पडवळ)

# विकासित भारत घडविण्याचे काम करूया : डॉ. विजय लाड

अकोले : (स. गांवकरी)



ग्राहक पंचायत महाराष्ट्र,नाशिक व अहिल्यानगर जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. १३ जून रोजी घोटी येथील मातोश्री हॉस्पिटल सभागृहात अभ्यास वर्गाचे प्रमुख मार्गदर्शक ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे राज्याध्यक्ष डॉ. विजयराव लाड अध्यक्ष पदावरून बोलतांनी

ग्राहक पंचायत ही केवळ ग्राहकांच्या तक्रारी अनेक अडचणी सोडवणूक साठी नेहमी, अग्रेसर, तत्पर असते जागरूक, जबाबदार आणि राष्ट्रहित जपणारा ग्राहक घडविणारी सामाजिक चळवळ आहे. सजग ग्राहक हीच सक्षम अर्थव्यवस्था आणि सशक्त राष्ट्रनिर्मीतीची गुरुकिल्ली असल्याचे प्रतिपादन ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे राज्याध्यक्ष डॉ. विजयराव लाड यांनी केले आहे. तसेच ते म्हणाले की, स्वामी विवेकानंद आणि ग्राहक तीर्थ बिंदू माधव जोशी यांच्या विचारांवर आधारित ग्राहक पंचायत चळवळ देशभरात कार्यरत असून ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करून विकसित भारत घडविण्याचे काम करीत आहे. ग्राहक आयोग, ग्राहक तक्रार निवारण मंच आणि न्यायालयांमधील रिक्त पदांबाबत व राज्यातील शासकीय कार्यालयातील रिक्त पदांबाबत राज्य शासनाशी सातत्याने पाठपुरावा सुरु असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्य सचिव अरुण वाघमारे यांनी ग्राहक पंचायतची संघटनात्मक रचना, कार्यपध्दती व ग्राहक चळवळीची ग्राहक कार्यकत्याची ताकद याविषयी मार्गदर्शन केले. ग्राहकांच्या प्रश्नांसाठी निःस्वार्थी व संघटितपणे काम करणे हीच चळवळीची खरी शक्ती असल्याचे त्यांनी सांगितले

अभ्यास वर्गात अश्वमेध लॅबोरेटरीचे विजय मुसळे व त्यांच्या पथकांने, दुध, पनिर, तेल, खवा आणि विविध खाद्यपदार्थांमधील भेसळ ओळखण्याचे प्रात्यक्षिक सादर करुण दाखवले या मुळे उपस्थित नागरिकांना भेसळीविरोधात सजग राहाण्याचे आवाहन करण्यात आले.

मार्गदर्शन सत्र पहिले व दुसरे यामध्ये नाशिक विभागीय अध्यक्ष डॉ. अजय सोनवणे, प्रवासी महासंघाचे रणजित श्रीगौड, अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी तांबोळी, वजन व मापे विभागाचे अधिकारी सुरेश सांगळे, चंद्रकांतजी डांगा आदींनी मार्गदर्शन केले.

या सह डॉ. गोरख बारहाते, अ‍ॅड. सिद्धार्थ वाघमारे, मच्छींद्र मंडलीक, महेश नवले, दत्ता शेनकर, माधवराव तिटमे, अनंत घाणे, सुरेश गबाले, दत्तात्रय काशिद, अ‍ॅड. सुभाष गोडगे, ज्ञानेश्वर राक्षे, रामदास पवार,डॉ. संजय देवकर, दत्तात्रय सोनार, कृष्णराव बागडे, डॉ. सुरेश सोनवणे, आदींची उपस्थिती.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन, स्वामी विवेकानंद आणि ग्राहक तिर्थ बिंदूमाधव जोशी यांच्या प्रतिमांचे पुजन व ग्राहक गीताने करण्यात आली,

अन्न व औषध महाराष्ट्र राज्य प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांना त्यांचा कार्यकाळ पूर्ण क्षमतेने पार पाडण्यासाठी पुरेसा कालावधी देण्यात यावा असा सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन गोपाळ शिंदे यांनी केले प्रास्ताविक डॉ संजय पाटील, व आभार डॉ. जितेंद्र चोरडिया यांनी मानले.

## खेड भैरव गावातील बाधित शेतकऱ्यांचा प्रशासनाला इशारा

इगतपुरी: (स. गांवकरी)



खेड भैरव गावातील गट नंबर १९२ शेता लगत येथून जुना हाडोळा हा रस्ता शासनाच्या निधीतून तयार करण्यात आलेला पारंपारिक बऱ्हे वस्ती ते वाजे वस्ती हा रस्ता बंद केल्याने ग्रामस्थांच्या शेती व दैनंदिन जीवनावर परिणाम होत आहे. सदर रस्ता त्वरीत खुला करुन दडपशाही थांबवा, रस्ता उघडा ! खेड भैरव गावातील बाधित शेतकऱ्यांचा प्रशासनाला इशारा देऊन रस्ता खुला करावा अशी मागणी ग्रामस्थांनी मंडल अधिकारी यांच्याकडे केली आहे. या बाबत अधिक माहिती अशी की, इगतपुरी तालुक्यातील खेड भैरव गावातील गट नंबर १९२ शेता लगत येथुन जाणारा जुना हाडोळा हा शासनाच्या निधीतून तयार झालेला रस्ता असून पूर्वापार वापरात असलेला पारंपारिक सार्वजनिक रस्ता येथील काही शेतकऱ्यांनी बंद केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या रस्त्यामुळे गावकऱ्यांची शेती दैनंदिन कामे तसेच शेतीसाठी आवश्यक अवजारे व साहित्य ने-आण करण्याचे काम पूर्णपणे विस्कळीत झाले असून ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार गट क्रमांक १९२ शेता लगत जाणारा हा पारंपारिक रस्ता संबंधित शेतकऱ्याने अडवणुक करून रस्ता अडवला आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत पोहोचणे कठीण झाले असून शेतीची कामे रखडली आहेत.

## अधिक मास निमित्ताने 'ब्रह्मा भोजन' व आध्यात्मिक कार्यक्रम संपन्न

पारनेर : (स. गांवकरी)



पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या वतीने नुकताच 'अधिक मास' निमित्ताने एक विशेष आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण 'ब्रह्मा भोजन' हा पवित्र सोहळा होता, ज्यामध्ये परिसरातील मोठ्या संख्येने भाविकांनी सहभाग नोंदवला.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. राजेश्वरी दिदी, निर्मला दिदी, सुवर्णा दिदी, प्रभा दिदी, साधना दिदी, सविता दिदी, वंदना दिदी, प्रिया दिदी, वृषाली दिदी आणि उज्वला दिदी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. या शुभप्रसंगी उपस्थित सर्व मान्यवरांनी ईश्वरी स्मरणाने वातावरणात सात्विकता निर्माण केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना स्थानिक संचालिका उज्वला दिदी यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले आणि या अध्यात्मिक उपक्रमाचा हेतू स्पष्ट केला. अधिक मासाच्या पवित्र काळात आत्मिक उन्नतीसाठी अशा कार्यक्रमांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक राजेश्वरी दिदी यांनी आपल्या प्रभावी प्रवचनातून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांनी अधिक मासाचे धार्मिक आणि आध्यात्मिक स्वरूप अत्यंत सोप्या भाषेत समजावून सांगितले. राजेश्वरी दिदी म्हणाल्या की, "अधिक मास हा केवळ धार्मिक विधींचा काळ नसून तो आत्मचिंतनाचा आणि स्वतःला ईश्वराच्या अधिक जवळ नेण्याचा सुवर्णकाळ आहे." त्यांनी उपस्थितांना 'देहभान' विसरून 'आत्म-अभिमानी' अवस्था धारण करण्याची प्रेरणा दिली. त्यांनी स्पष्ट केले की, आपण सर्व त्या परमात्म्याची मुले आहोत, हा भाव जेव्हा आपल्या जीवनात दृढ होतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने अध्यात्माची प्रचिती येते. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे संस्थापक प्रजापिता ब्रह्मा बाबा यांचे उदाहरण देताना त्यांनी सांगितले की, बाबांनी सर्वांकडे पाहताना नेहमी 'आत्मिक दृष्टी' ठेवली होती. जेव्हा आपण सर्वांना देहाच्या पलीकडे जाऊन आत्म्याच्या रूपात पाहतो, तेव्हाच समाजात प्रेम, शांती आणि बंधुभावाची स्थापना होऊ शकते.

या आध्यात्मिक कार्यक्रमामुळे टाकळी ढोकेश्वर परिसरातील वातावरण भक्तिमय झाले होते. कार्यक्रमाच्या शेवटी 'ब्रह्मा भोजनाचा' प्रसाद ग्रहण करून भाविकांनी धन्यता मानली. या प्रसंगी ब्रह्माकुमारी परिवारातील सर्व सदस्य आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्याने हा कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि मंगलमय वातावरणात पार पडला.

## रासायनिक खत टंचाईच्या प्रश्नावरून शिवसेना ठाकरे पक्षाचा कृषी कार्यालयावर घेराव

भोकर : (स. गांवकरी)



खरीप हंगामाच्या तोंडावर रासायनिक खतांची कृत्रिम टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांकडून जादा दराने खतांची विक्री केली जात असल्याच्या तक्रारींवरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पदाधिकारी व शिवसैनिकांनी भोकर येथील कृषी कार्यालयात धडक देत कृषी अधिकारी दिलीप जाधव यांना घेराव घातला. यावेळी कृषी दुकानदार आणि भरारी पथकाचे साटेलोटे असल्याचा गंभीर आरोप शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला.

शिवसेनेचे जिल्हा संघटक सुभाष नाईक किनीकर आणि माजी जिल्हा परिषद सदस्य सुनील चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कृषी अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. शेतकऱ्यांना खत उपलब्ध नसल्याचे सांगितले जात असून, उपलब्ध खतांसाठीही अतिरिक्त पैसे आकारले जात असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी बोलताना सुनील चव्हाण यांनी, "खत टंचाई आणि वाढीव दरामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. संबंधित प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल," असा इशारा दिला. तर सुभाष नाईक किनीकर यांनी कृषी दुकानदार आणि भरारी पथक यांच्यातील संगनमतामुळेच अशा प्रकारांना खतपाणी मिळत असल्याचा आरोप करत संबंधितांवर कारवाईची मागणी केली. यावर कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी सर्व खत विक्रेत्यांची बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला जाईल व त्यानंतर आवश्यक ती कारवाई करण्यात येईल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही, असे आश्वासन त्यांनी दिले. या आंदोलनात कृषी सहायक कराळे, दिव्यांग सेनेचे तालुकाप्रमुख विठ्ठल देवड, ज्येष्ठ शेतकरी नरसय्या मेंडेवाड, प्रकाश बोंदिरवाड, संतोष जाधव, सुनील आडे, अंकुश आडे, कल्याण कराळे यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

## देवेंद्रची मुंबई महापालिकेत कार्यकारी सहायक पदावर निवड

ठाणे : (स. गांवकरी)



दिवा शहरात राहणारा तरुण देवेंद्र गणपत गव्हाणे या युवकाने आपल्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करत कठोर परिश्रमाच्या जोरावर सरळसेवा परीक्षा उत्तीर्ण होत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (BMC) कार्यकारी सहाय्यक पदावर निवड मिळवली आहे. त्याच्या या यशामुळे दिवा शहरात राहत असलेल्या परिसरात आनंदाचे वातावरण असून तरुणांसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. देवेंद्र हा मूळचा पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील थापेवाडी व पाबळ येथे प्राथमिक शिक्षण घेतले होते. पुढे वडिलांच्या नोकरी निमित्त तो दिवा येथे येऊन माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर दापोली कृषी विद्यापीठातून पदवीचे शिक्षण पूर्ण केले. वडिलांसह कुटुंबीयांचे त्याला मोलाचे मार्गदर्शन लाभले. विशेषतः त्याच्या दोन्ही बहिणींचे योगिता भिवाजी बगाटे आणि गायत्री राहुल कानसकर यांचे सहकार्य व पाठबळ त्याच्या यशामागे महत्त्वाचे ठरले. शिक्षणासाठी देवेंद्र आपली बहीण गायत्री राहुल कानसकर यांच्याकडे राहात होता. दोन्ही बहिणींनी त्याला सातत्याने प्रोत्साहन दिले व अभ्यासासाठी आवश्यक मदत केली. तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी असलेले मोठे भाऊ निमकंठ गव्हाणे यांच्याकडूनही त्याला प्रेरणा मिळाली. “आपणही अधिकाऱ्याच्या पदावर जावे” या ध्येयाने प्रेरित होऊन देवेंद्रने २०२४ मध्ये झालेल्या शासकीय सरळसेवा परीक्षेत सहभाग घेतला.

# वीज प्रश्नावर आ. भीमराव केराम आक्रमक

### महावितरण अधिकाऱ्यांची तातडीची धाव, दिला कृती आराखड

किनवट : (स. गांवकरी)



किनवट-माहूर तालुक्यातील गंभीर वीज समस्यांबाबत आ. भीमराव केराम यांनी महावितरण प्रशासनाला दिलेल्या कडक इशाऱ्यानंतर अखेर महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आज आ. केराम यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी अधिकाऱ्यांनी सध्याच्या वीज परिस्थितीची माहिती देत समस्या सोडविण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा कृती आराखडा सादर केला. तसेच आ. केराम यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांवर अधिकाऱ्यांनी स्पष्टीकरण देत त्यांच्या सूचनांची नोंद घेतली. गेल्या काही दिवसांपासून किनवट व माहूर तालुक्यात वारंवार होणारा वीजपुरवठा खंडित होणे, कमी दाबाने वीज मिळणे, शेतीपंपांना अपुरा पुरवठा, जळालेले डीपी, जीर्ण विद्युत खांबे आणि खराब वीजवाहिन्यांमुळे नागरिक व शेतकरी मोठ्या प्रमाणावर त्रस्त आहेत. या पार्श्वभूमीवर आ. भीमराव केराम यांनी महावितरण प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करत तातडीने सुधारणा न झाल्यास आगामी पावसाळी अधिवेशनात प्रशासनाला धारेवर धरण्याचा कडक इशारा दिला होता. या इशाऱ्याची गंभीर दखल घेत महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आज आ. केराम यांची भेट घेतली. यावेळी आ. केराम यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सुनावत, नागरिकांना मूलभूत सेवेसाठी वारंवार संघर्ष करावा लागत असेल तर ती अत्यंत गंभीर बाब असल्याचे सांगितले. वीजपुरवठ्यातील त्रुटी तात्काळ दूर करून ग्रामीण व शहरी भागातील ग्राहकांना दिलासा देण्यासाठी युद्धपातळीवर काम करण्याचे निर्देश त्यांनी दिले. किनवट-माहूर तालुक्यातील अनेक गावांमध्ये आवश्यक ठिकाणी नवीन डीपी बसविण्याची कार्यवाही त्वरित सुरू करावी, अशा स्पष्ट सूचना आ. केराम यांनी दिल्या. शेती हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना वेळेवर आणि पुरेशा दाबाने वीज उपलब्ध करून देणे ही महावितरणची जबाबदारी असल्याचेही त्यांनी ठणकावून सांगितले. यावेळी अधिकाऱ्यांनी विविध भागांतील प्रलंबित कामे, मनुष्यबळाची उपलब्धता, तांत्रिक अडचणी तसेच आगामी काळात करण्यात येणाऱ्या सुधारणा यांची माहिती दिली. वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी विशेष मोहीम राबविणे, दोषग्रस्त यंत्रणा दुरुस्त करणे, नवीन साहित्य उपलब्ध करून देणे आणि तक्रारींचे तातडीने निवारण करण्याबाबत अधिकाऱ्यांनी आ. केराम यांना आश्वस्त केले. बैठकीस गाडेकर (कार्यकारी अभियंता, प्रशासन, नांदेड), बोरगावकर (कार्यकारी अभियंता, भोकर), केंद्र (उपकार्यकारी अभियंता, किनवट), बिराजदार (सहाय्यक अभियंता, भोकर), मेश्राम (सहाय्यक अभियंता, किनवट शहर), देशमुखे (सहाय्यक अभियंता, किनवट ग्रामीण-१), चव्हाण (कनिष्ठ अभियंता, किनवट ग्रामीण-२) तसेच क्षीरसागर (कनिष्ठ अभियंता, बोधडी) यांच्यासह महावितरणचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. "जनतेला अखंडित व गुणवत्तापूर्ण वीजपुरवठा मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. समस्या सोडविण्यात कोणतीही कुचराई किंवा दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही. दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी झाली नाही तर जनतेच्या प्रश्नांसाठी आणखी आक्रमक भूमिका घेतली जाईल," असा स्पष्ट इशारा आ. भीमराव केराम यांनी यावेळी दिला.

# थोडक्यात पण महत्वाचे



## जिल्हा बैठक उत्साहात; राज्याध्यक्ष बाळासाहेब सोनवणे यांचा सत्कार

नाशिक (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी अधिकारी संघटनेची जिल्हा बैठक नुकतीच संघटनेचे मार्गदर्शक तथा शिक्षण विस्तार अधिकारी भाऊसाहेब जगताप यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाली. यावेळी नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील मांजरगाव येथील भूमिपुत्र बाळासाहेब सोनवणे यांची महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी अधिकारी संघटनेच्या राज्य अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा जिल्हा संघटनेच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार सोहळा जिल्हाध्यक्ष सोमनाथ कराड व भाऊसाहेब जगताप यांच्या हस्ते पार पडला. यावेळी व्यासपीठावर राज्याध्यक्ष बाळासाहेब सोनवणे, राज्य उपाध्यक्ष सतीश लाड, राज्य सहसचिव राजेश निकुंभ, विभागीय कोषाध्यक्ष सुरेश कापडणीस, राज्य संचालक मनोहर नेतावटे, विनोद अहिरे आदी मान्यवर उपस्थित होते. बैठकीत दिव्यांग कर्मचारी, अधिकारी व दिव्यांग बांधवांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ६ मे २०२६ रोजी दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयाचे संघटनेच्यावतीने स्वागत करण्यात आले. या निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कायदेशीर व संघटनात्मक भूमिकेबाबत मार्गदर्शन राज्याध्यक्ष बाळासाहेब सोनवणे यांनी केले. तसेच जिल्हाध्यक्ष सोमनाथ कराड यांनी न्यायालयीन निर्णयाबाबत तसेच दिव्यांग कर्मचारी समस्यांबाबत मार्गदर्शन केले. बैठकीत विनोद अहिरे, ग्रामसेवक पंकज पवार, सुरेश कापडणीस, निंबा मोरे, विलास पाटील, सतीश लाड आदींनी मनोगत व्यक्त केले.

## उत्तर पुणे जिल्हा उपाध्यक्ष पदी राजेंद्रकुमार शेळके यांची निवड



जुन्नर तालुका (स. गांवकरी) : नारायणगाव नगरीचे रहिवासी व ओतूर येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब वाघिरे महाविद्याल यातील प्रशासकीय कर्मचारी पत्रकार राजेंद्रकुमार ज्ञानेश्वर शेळके यांची अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्यावतीने उत्तर पुणे जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आल्याची माहिती राष्ट्रीय अध्यक्ष शरद गोरे यांनी दिली. राजेंद्रकुमार शेळके हे एक प्रतिथयश कवी लेखक असून त्यांनी श्री विघ्नहर्ता ग्रुपच्या वृत्तीने अनेक राज्य स्तरीय काव्यस्पर्धेचे आयोजन केले आहे.आजवर त्यांना अनेक राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कार मिळाले असून अनेक कार्यक्रम त्यांचे पुणे आकाशवाणी केंद्रावर प्रसारित झाले आहे.त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश शिरसाट,उप प्राचार्य डॉ.के.डी.सोनावणे, ज्युनिअर विभाग उपप्राचार्य अमृत बनसोडे,सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी वृंद तसेच पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव ॲड.संदीप कदम, खजिनदार ॲड.मोहन देशमुख, उप सचिव एल.एम.पवार,सह सचिव प्रशासन ए. एम. जाधव आदी संस्था पदाधिकारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## सरकारी धरणाच्या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचाराचे आरोप

डांग. गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्ह्यातील आहवा तालुक्यातील किरली ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या पोलसमाळ गावात सरकारी योजनेअंतर्गत सुरू असलेल्या धरण खोलीकरण व संरक्षण भिंत (पिचिंग/प्रोटेक्शन वॉल) बांधकामाच्या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आणि बनावट कामकाज झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. डांग जिल्हा कॉंग्रेस आयटी सेलचे अध्यक्ष मनीष के. मारकणा यांनी पोलसमाळ गावातील ग्रामस्थांच्या वतीने आहवा येथे जिल्हा विकास अधिकारी (DDO) यांना लेखी निवेदन देऊन तातडीने निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, पोलसमाळ गावात धरण खोलीकरण आणि संरक्षण भिंत उभारण्याचे सरकारी काम सध्या सुरू आहे. मात्र या कामात कंत्राटदार आणि संबंधित यंत्रणेकडून अत्यंत निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून केवळ दिखाव्यासाठी बांधकाम करण्यात येत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सिमेंट, वाळू आणि खडी यांचे योग्य प्रमाणात मिश्रण न वापरता केवळ वरवर सिमेंटचा पातळ थर देण्यात आला असून आतील बांधकाम पूर्णपणे कमकुवत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.ग्रामस्थांनी पुरावा म्हणून कामाचे फोटो आणि व्हिडिओ सादर केले आहेत. त्यामध्ये साध्या काठीच्या फटक्यानेही सरकारी बांधकामाचा भाग कोसळत असून आतून माती आणि दगड बाहेर येत असल्याचे दिसून येत आहे.



## ओतूर येथील विद्यालयात नवगतांचे जल्लोषात स्वागत

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील ग्राम विकास मंडळ संचलित चैतन्य विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ या नूतन वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या पाचवीच्या सर्व विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आल्याची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर यांनी दिली. सर्व नवीन विद्यार्थ्यांची ढोल ताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करून त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे हे होते. विद्यालयाच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांचे व पालकांचे स्वागत त्यांनी केले. पहिल्याच दिवशी पाचवी ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी ग्राम विकास मंडळाचे अध्यक्ष अनिल तांबे, प्रदीप गाढवे, पंकज घोलप, प्रतीक अकोलकर, संजय हिरे, किसन भूतांबरे, अजित डांगे, विनोद हाडवळे, मनोहर तांबे, दत्तात्रय घोलप, विनायक हाडवळे, दीपक अहिनवे, प्रवीण नलावडे, पंकज डुंबरे, सागर दुधवडे, शिल्पा घुले, माधुरी अहिनवे, शितल जगताप, कल्याणी फटांगरे, विद्या हाडवळे आदी पालक बहुसंख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर म्हणाले की, “चैतन्य विद्यालय ही गुणवत्तापूर्ण शाळा आहे. तालुक्यात सर्वाधिक निकाल आपल्याच विद्यालयाचा आहे. विद्यालयाची वाढलेली विद्यार्थी संख्या म्हणजे पालकांचा विद्यालयावर असणारा विश्वास आणि विद्यालयाची निकालाची उज्वल परंपरा, गुणवत्ता हेच याचे द्योतक आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हेच विद्यालयाचे ध्येय आहे.” या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित झरेकर यांनी केले. आभार अजित डांगे यांनी मानले.

# शासनाच्या आदेशाला केराची टोपली

### मार्कंड पर्वतावर भाविकांची गर्दी : मंदिर दर्शनास बंदी असूनही हजारो भाविक दाखल; प्रशासनाचा बंदोबस्त गायब

कळवण/कनाशी : (स. गांवकरी)

सोमवती अमावस्या यात्रोत्सवानिमित्त मार्कंड पर्वतावर दर्शनास बंदी घालण्यात आल्याचा शासन आदेश असतानाही भाविकांनी या आदेशाला केराची टोपली दाखवली आहे. मोठ्या संख्येने भाविक मार्कंड पर्वतावर दर्शनासाठी जात असल्याचे चित्र रविवारी दिवसा रात्रीपासून पाहायला मिळाले. मात्र, प्रशासनाकडून कुठलाही बंदोबस्त नसल्याने शासनाचा हलगर्जीपणा चव्हाट्यावर आला आहे.



उपविभागीय दंडाधिकारी कळवण यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ३४ नुसार दि. १५ जून रोजी होणाऱ्या सोमवती अमावस्या यात्रेसाठी मार्कंड ऋषी पर्वतावर भाविकांना जाण्यास बंदी घातली आहे. तहसीलदार कळवण व पोलीस निरीक्षक कळवण यांच्या अहवालानुसार, सपाटी भागाजवळ पर्वतावर जाण्यासाठी असलेला लोखंडी जिना अत्यंत दुर्लक्षित व जीर्ण झाला आहे. अरुंद मार्गामुळे चढणारे व उतरणारे भाविक समोरासमोर आल्यास चेंगराचेंगरी होऊन जिवीतहानी होण्याची दाट शक्यता आहे. दि. १९/०७/२०२३ रोजी २ भाविक दगड कोसळून तर ३ भाविक दरीत पडून जखमी झाल्याच्या घटना यापूर्वी घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने फक्त पहिल्या पायरीवरच दर्शन घेण्यास परवानगी दिली होती. वाहनतळ व पार्किंगची व्यवस्था मुळाणे व गोबापूर गावात करण्याचे आदेश दिले होते. प्रशासनाने दर्शनास बंदी घातली असूनही रात्रीपासूनच हजारोंच्या संख्येने भाविक मार्कंड पर्वताकडे रवाना झाले. पहिल्या पायरीवर दर्शन घेण्याच्या आदेशाला डावलून भाविक थेट गडावर पोहोचले. धक्कादायक बाब म्हणजे, बंदी असूनही प्रशासनाचा कोणताही बंदोबस्त गडावर किंवा पायथ्याशी दिसला नाही. पोलीस, महसूल किंवा आपत्ती व्यवस्थापन पथकाचे एकही कर्मचारी तैनात नव्हते. त्यामुळे भाविक बिनधास्तपणे जीव धोक्यात घालून अरुंद व धोकादायक लोखंडी जिन्याने गड चढत होते. जीर्ण झालेला लोखंडी जिना, अरुंद वाट, हजारोंची गर्दी... हे चित्र कोणत्याही क्षणी मोठ्या दुर्घटनेला निमंत्रण देणारे आहे. शासनाने बंदी घातली, पण अंमलबजावणी केली नाही. परिणामी भाविकांचा जीव टांगणीला लागला आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन पुढील काळात योग्य नियोजन करावे, अशी मागणी होत आहे.

#### प्रशासनाचा हलगर्जीपणा उघड

बाहेर राज्यातून, नाशिक जिल्हा व कळवण पंचक्रोशीतून हजारोंच्या संख्येने भाविक येतात. गर्दी नियंत्रण, वैद्यकीय व्यवस्था, संरक्षण व्यवस्था शासनामार्फत पुरवावी, अशी मागणी ग्रामस्थांनी दि. ८ जून रोजीच्या अर्जात केली होती. मात्र प्रशासनाने सुरक्षा कारणास्तव यात्रा रद्द केली. परंतु यात्रा रद्द करूनही ती रोखण्यासाठी कोणतीही उपाययोजना न केल्याने प्रशासनाचा हलगर्जीपणा उघड झाला आहे. “आदेश फक्त कागदावरच राहिला. प्रत्यक्षात एकही पोलीस दिसला नाही. उद्या दुर्घटना घडली तर जबाबदार कोण?” असा संतप्त सवाल स्थानिक ग्रामस्थ विचारत आहेत.

## शिंदोळ्या एक गावरान मेवा आणि गरिबांचा खजूर पिकला

- पुष्पावती नदी खोऱ्यात ताडी, नीरेसाठी झाडांचा जातोय जीव

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्याच्या पश्चिम भागात असणाऱ्या पुष्पा वती नदीच्या उगमापासून ते संपूर्ण खोऱ्यातील उदापूर, डिंगोरे,कोळवाडी,पिंपळगाव जोगा,मढ, खिरेश्वर, खुबी, करंजाळे,सांगणोरे,पारगाव, सितेवाडी नेतवड,हिवरे,येडगाव या गांवच्या शिवारात शिंदाडीची शिंदोळ्या परिपक्व झाल्या असून बच्चे कंपनी त्यावर ताव मारताना दिसून येत आहेत. मात्र, दिवसेंदिवस ही झाडे झपाट्याने कमी होत आहेत. शिंदिच्या झाडाला मधुर व गोड काहीशी तुरट चवीची अगदी खजुरा सारखीच पण त्यापेक्षा आकाराने थोडीशी लहान फळे येतात.ही फळे गरिबांचा गावरान खजूर म्हणून लोकप्रिय आहे. शिंदाडीच्या झाडापासून नीरा व ताडीची निर्मिती केली जाऊ लागली त्यासाठी या शिंदाडीच्या झाडाला जेथे झावळ्या फांद्या फुटतात तेथे काप करून त्यास ड्रम अथवा मडके लावून त्यातून येणारा रस, जो प्रथम नीरा व नंतर ताडी म्हणून विकला जातो याच्या विक्रीचा सरकारी परवाना दिला जातो मात्र विक्रेते त्यात मादक पावडर मिसळून जास्त नफा मिळवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे पेयामुळे अनेक तरुण व्यसनाधीन झाले आहेत. वृक्षमित्र, विविध संस्था, वृक्षप्रेमी संघटना आणि वनविभाग यांनी पुढाकार घेऊन शिंदाडीच्या झाडांच्या संवर्धनासाठी काम करावे आणि पर्यावरण संतुलित ठेवण्यासाठी मदत करावी, अशी मागणी पर्यावरण प्रेमी मित्रांकडून केली जात आहे. नीरा,ताडी व सपाटी करणामुळे शिंदाडीची झाडे नामशेष होत आहेत.

## विक्रम झावरे यांच्याकडून मोफत पाणी टँकर

- तीव्र पाणीटंचाई लक्षात घेता ग्रामस्थांच्या हस्ते टँकरचे भूमिपूजन
- संकटकाळात टाकळी ढोकेश्वरकरांना मोठा दिलासा

पारनेर : (स. गांवकरी)



पारनेर तालुक्याच्या उत्तर भागात सध्या तीव्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून पाणीटंचाईचे सावट गडद झाले आहे. तालुक्याची प्रमुख बाजारपेठ असलेल्या टाकळी ढोकेश्वर व परिसरामध्ये सध्या नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी वणवण करावी लागत आहे. उन्हाळ्यातील हीच भीषण समस्या ओळखून येथील सामाजिक व युवा नेते विक्रम झावरे यांनी टाकळी ढोकेश्वर गावासाठी स्वखर्चाने मोफत पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू केले आहेत. नागरिकांची पाण्यासाठी होणारी ससेहोलपट थांबवण्यासाठी त्यांनी घेतलेल्या या निर्णयाचे तालुक्यात मोठे कौतुक होत आहे. या मोफत पाणी टँकर सुविधेचे भूमिपूजन नुकतेच स्थानिक ग्रामस्थांच्या हस्ते अत्यंत साधेपणाने करण्यात आले. दरवर्षी उन्हाळ्यात या भागाला पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. बाजारपेठेचे गाव असल्याने येथे पाण्याची गरज मोठी आहे. ग्रामस्थांना पाण्यासाठी वणवण करावी लागू नये, याच सामाजिक भावनेतून ही मोफत टँकर सेवा सुरू करण्यात आली असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

याप्रसंगी परिसरातील अनेक मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये अशोक कटारिया, किसनराव धुमाळ, अंकुश पायमोडे, मळीभाऊ रांधवन, कृष्णा बांडे, प्रसाद खिलारी, दत्ता निवडुंगे, बबलू झावरे, मोहनराव रांधवन, भाऊसाहेब झावरे, भास्कर पायमोड, नामदेव ठुबे, संपत तराळ, नितीन खोडदे, राहुल बांडे, लहू जाधव, गणेश झावरे, देवा झावरे, महेश झावरे, संजय झावरे, अभिजित जाधव, अशोक शेठ कटारिया, पांडुरंग झावरे, बोरुडे गुरुजी, विशाल पायमोडे, संतोष खिलारी, बाळशीराम पायमोडे, मच्छिंद्र झावरे, विष्णू झावरे, श्रावण गायकवाड, कुसकर सर, पांडुरंग गोरडे, बाबा गागरे, पांडुरंग बाडे, राजू नाना झावरे, आप्पा झावरे, संतोष बांडे, इंद्रभान गोरडे, संजय उदावंत, अशोक रांधवन सर, ठकाजी गागरे, ठका गोरडे, विठ्ठल पायमोडे, जाधव महाराज, भानुदास झावरे, सुरेश बांडे आदी उपस्थित होते. संकटकाळात धावून आलेल्या या उपक्रमामुळे टाकळी ढोकेश्वर गावातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## पाचवी प्रवेशोत्सव व दहावीतील गुणवंतांचा सत्कार उत्साहात

ओतूर : (स. गांवकरी)




जुन्नर तालुक्यातील डिंगोरे येथील ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित पुष्पावती विद्यालयात इयत्ता पाचवीच्या नवीन विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव तसेच इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाल्याची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक शरद माळवे यांनी दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद माजी सदस्य अंकुश आमले होते. प्रमुख उपस्थितीमध्ये पंचायत समिती सदस्या नीलम आमले, माजी जिल्हा परिषद सदस्य बबनराव तांबे, ग्रामविकास मंडळ ओतूरचे खजिनदार रघुनाथ तांबे, माजी सरपंच निलेश लोहोटे, संपत खरात, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष लक्ष्मण लोहोटे, शिवाजी शेरकर, दत्ता लोहोटे, रवींद्र लोहोटे, सिताराम डुंबरे, शांताराम पानसरे, स्वामी विवेकानंद विचार मंचाचे अध्यक्ष गणेश आमले, सचिन खरात, उपसरपंच राजेंद्र उकिरडे, अहिलूनाना लोहोटे, नीता शेरकर, निलोफर पठाण, स्नेहल लोहोटे, नितीन आमले, समीर लोहोटे, अंकुश चापेकर, उल्हास आमले आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना अध्यक्ष अंकुश आमले म्हणाले की, "विद्यार्थ्यांनी वर्षभर विविध शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन स्वतःचा सर्वांगीण विकास साधावा. ज्ञानसंपन्न बनून शाळेचा व गावाचा नावलौकिक वाढवावा," असा मोलाचा संदेश दिला. प्रवेशोत्सवानिमित्त इयत्ता पाचवीच्या नवीन विद्यार्थ्यांची वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी वर्गखोल्या आकर्षक फुग्यांनी सजविण्यात आल्या होत्या. सर्व विद्यार्थ्यांना गोड पदार्थ वाटप करण्यात आले तसेच प्रत्येक विद्यार्थ्यास पेन व चॉकलेट भेट देण्यात आले. यावेळी मार्च २०२६ च्या दहावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये श्रेयशी पडवळ, दर्शील लोहोटे, ओम शेरकर, जान्हवी सुकाळे, आर्या लोहोटे, अनुष्का कोकणे, श्रावणी लोहोटे, सेजल थापेकर, सार्थक शेरकर, साई लोहोटे व हर्षल कुमकर या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

## जुन्नर तालुक्यात “खेत बचाओ अभियान” उत्साहात संपन्न

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

भारतीय कृषी अनुसंधान परिषद,नवी दिल्ली यांच्यावतीने राबविण्यात येणारे “खेतबचाओ अभियान” जुन्नर तालुक्यातील विविध गावांमध्ये उत्साहात संपन्न झाले.या अभियानांतर्गत गोळेगाव,अलदरे,पिंपळगाव सिद्धनाथ,आगर,कुसूर,वडज, चिंचोली,पारुंडे व वैष्णवधाम या गावांमध्ये शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.या उपक्रमासाठी फोरकास्ट ॲग्रोटेक इनोव्हेशन्स प्रा. लि.आणि डिसेंट फाउंडेशन, पुणे यांनीही सहकार्य केले. देशभरात १ जून ते ३० जून या कालावधीत सुरू असलेल्या या अभियानांतर्गत केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या अधिपत्याखालील भारतीय कृषी अनुसंधानपरिषद केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था,माटुंगा (मुंबई)येथेकार्यरत असलेले प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. अशोककुमार भारीमल,प्रधान शास्त्रज्ञ डॉ.कनिका शर्मा, तांत्रिक अधिकारी शरदराव कोकणे,मुख्य तांत्रिक अधिकारी प्राची म्हात्रे,फोरकास्ट ऍग्रोटेक चे संचालक डॉ. संतोष सहाणे , कृषी विज्ञान केंद्र नारायणगाव चे मृदा शास्रज्ञ योगेश यादव, कृषिभूषण श्रीराम गाढवे, कृषिभूषण जितेंद्र बिडवई,कृषी अधिकारी बापूसाहेब रोकडे आणि कृषी सहायक अमोल मोरे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी डॉ.अशोककुमार भारीमल यांनी जमिनीचेआरोग्य नैसर्गिक शेतीचे आर्थिकआरोग्य दृष्ट्या असलेले महत्त्व, शेतकऱ्यांनी पूरक व्यवसाय उभारताना केंद्र शासनाकडून उपलब्ध होणारे अर्थसहाय्य तसेच पीक नियोजन याविषयी सविस्तर माहिती दिली.डॉ. कनिका शर्मा यांनी माती परीक्षणाचे महत्त्व आणि रासायनिक खतांचा कमी वापर करण्याबाबत मार्गदर्शन केले.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा बाकलीवाल ट्युटोरियल्सतर्फे गौरव



पुणे : (स. गांवकरी)

अभियांत्रिकी प्रवेशासाठीच्या संयुक्त प्रवेश परीक्षेची प्रगत पातळी, राष्ट्रीय विज्ञान स्पर्धा, होमी भाभा परीक्षा तसेच दहावी-बारावी मंडळ परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा बाकलीवाल ट्युटोरियल्सतर्फे आयोजित वार्षिक गौरव सोहळ्यात सन्मान करण्यात आला. गणेश कला क्रीडा मंच येथे झालेल्या या कार्यक्रमास सुमारे अडीच हजार विद्यार्थी व पालक उपस्थित होते. यंदाच्या संयुक्त प्रवेश परीक्षेच्या प्रगत पातळीच्या निकालात संस्थेचे ४०८ विद्यार्थी पात्र ठरले असून, देशातील नामांकित तंत्रशिक्षण व विज्ञान संस्थांमध्ये प्रवेश मिळविण्याच्या दिशेने त्यांनी वाटचाल सुरू केली आहे. या सोहळ्यात प्रगत पातळीच्या परीक्षेत देशपातळीवरील उल्लेखनीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके, सुवर्ण व रौप्य नाणी तसेच स्मृतिचिन्हे देऊन गौरविण्यात आले. परीक्षेत पात्र ठरलेल्या इतर विद्यार्थ्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

## ‘आरोग्यदायी नैसर्गिक भातशेती’ पुस्तकातून शाश्वत शेतीचा नवा मार्ग

पुणे : (स. गांवकरी)




नैसर्गिक शेती, विषमुक्त अन्ननिर्मिती आणि जलसंवर्धनाचा संदेश देणाऱ्या ‘आरोग्यदायी नैसर्गिक भातशेती’ या पुस्तकाचे प्रकाशन वनराई संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात उत्साहात पार पडले. नैसर्गिक शेतीचे अभ्यासक, प्रयोगशील शेतकरी आणि समाजकल्याण विभागाचे सह आयुक्त प्रमोद जाधव लिखित या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

कार्यक्रमास वनराईचे विश्वस्त गिरीश गांधी, समाजकल्याण विभागाच्या आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे, कृषी प्रक्रिया व नियोजन-विस्तार विभागाचे कृषी संचालक विनयकुमार आवटे, कृषी-जैवविविधता तज्ज्ञ संजय पाटील, वैद्य खडीवाले वैद्यक संशोधन संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वैद्य विनायक परशुराम वैद्य खडीवाले, वनराईचे विश्वस्त सागर धारिया, सचिव अमित वाडेकर, लेखक प्रमोद जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात अमित वाडेकर यांनी कार्यक्रमामागील उद्दिष्टे स्पष्ट केली, तर सागर धारिया यांनी उपस्थितांचे स्वागत केले. विनायक गारडे यांनी आभार मानले. लेखक प्रमोद जाधव यांनी पुस्तक निर्मितीमागील प्रेरणा आणि नैसर्गिक भातशेतीतील अनुभव मांडले. अध्यक्षीय भाषणात गिरीश गांधी यांनी देशी बियाण्यांचे संवर्धन, जैवविविधतेचे जतन आणि शाश्वत शेतीच्या प्रसारासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी बोलताना दीपा मुधोळ-मुंडे यांनी डिजिटल युगात माहितीचा प्रचंड साठा उपलब्ध असला तरी ती माहिती दीर्घकाळ मनात साठवली जात नाही, असे सांगितले. पुस्तके आणि ग्रंथालये ही ज्ञान जतन करण्याची प्रभावी माध्यमे असून अशा पुस्तकांमुळे महत्त्वपूर्ण माहिती पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचते, असे त्यांनी नमूद केले. आपण जे अन्न खातो त्याचा थेट परिणाम आपल्या आरोग्यावर होत असल्याने नैसर्गिक आणि सेंद्रिय शेतीकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### आमदार संग्राम जगताप व उपमहापौर धनंजय जाधव यांचा वाढदिवस साजरा

■ प्रत्येकाने एक तरी झाड लावावे असा संकल्प करावा : डॉ. सुनील सकट

अहिल्यानगर (स. गांवकरी) : वृक्षारोपण ही काळाची गरज आहे. कोरोना काळात जेव्हा ऑक्सिजनची कमी जाणवली. तेव्हा पासून मानवाला पर्यावरणाचे महत्त्व लक्षात आले आहे.वाढते तापमान व उष्णता यामुळे मानवाचे जीवन असह्य झाले आहे.वृक्ष तोड करुन मानवाने पर्यावरणाची मोठी हानी केली आहे. उपमहापौर धनंजय जाधव यांनी ग्रीन सिटी हा प्रोजेक्ट हाती घेतला आहे. नागरिकांनी या प्रकल्पास भरभरून प्रतिसाद दिला आहे. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे.पर्यावरणाचा समतोल राखणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.प्रत्येकाने एक तरी झाड लावावे असा संकल्प करावा.असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाचा लोकशाहीर डॉ.आण्णा भाऊ साठे पुरस्कार प्राप्त डॉ.सुनिल सकट यांनी केले आहे. सावेडी जॉगींग पार्क येथे आमदार संग्राम जगताप व उपमहापौर अँड.धनंजय जाधव यांच्या वाढदिवसा निमीत्त सामाजिक कार्यकर्ते मल्हार गंधे यांच्या हस्ते कलमी आंब्याचे वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी गौरव परदेशी, हुजेफा शेख,आर्यन चव्हाण, अक्षय मेना आदी उपस्थित होते.हा उपक्रम भाजपा अनु.जा.मोर्चाचे शहरजिल्हा सरचिटणीस डॉ.सुनिल सकट व चिटणीस अशोक भोसले यांच्या पुढाकाराने राबवण्यात आला.



### जय मल्हार विद्यालयात नवोगत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

अहिल्यानगर (स. गांवकरी) : आज रोजी नवीन शैक्षणिक वर्ष 2026-27 शाळेच्या पहिल्याच दिवशी जय मल्हार विद्यालयात आठवी,नववी,व दहावीच्या विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले .विद्यार्थ्यांच्या गळ्यामध्ये पुष्पहार घालून वाजत मिरवणुकीने त्यांना विद्यालयामध्ये आणण्यात आले. विद्यालयामध्ये आल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना शालेय पुस्तके,दप्तर,आणि वह्या यांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यालयाची माजी विद्यार्थिनी कमल दिवेकर हिने विद्यालयातील विद्यार्थ्यांना १०० दप्तर किट उपलब्ध करून दिले.या कार्यक्रम प्रसंगी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक उत्तम सुंबरे,विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक उंडे बी आर,माजी पोलीस अधिकारी बाबाजी जगताप,मा सरपंच नानाभाऊ भांबरे,हभप आकाश महाराज घोलप,जिल्हा परिषदेचे शिक्षक नरवडे,माजी विद्यार्थिनी कमल दिवेकर, पंचायत समितीचे अधिकारी बांडे साहेब,ग्रामस्थ राजाराम भांबरे,शिक्षक गर्कळ सर, भगवान भांबरे,गौरी जगताप, संतोष घुले,नारायण पुंडे,पंडित बाई व विद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी, पिंपळगावरोठा ग्रामस्थ,पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी पालक बाबासाहेब खोसे यांनी विद्यालयाला वॉटर पुरिफायर हे मशीन देण्याचे जाहीर केले. त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जरांगे सर यांनी केले व आभार केदारी सर यांनी मानले.

### साईबन मधील लालभडक गुलमोहर झाडाची रांग पर्यटकांना आकर्षण



अहिल्यानगर (स. गांवकरी) : गुलमोहर वृक्षाची असंख्य झाडे साईबनमध्ये असून हा फुललेला गुलमोहर येणाऱ्यां लोकांचे आकर्षण ठरत आहे,गुलमोहर हा उष्ण प्रदेशात वाढणारा वृक्ष आहे. याला इंग्लिशमध्ये मे फ्लॉवर ट्री असे नाव आहे. गुलमोहर हा वैशाखातल्या रणरणत्या उन्हातही फुलणारा वृक्ष आहे.हा वृक्ष बहरात नसतानाही इतर वृक्षांपेक्षा अधिक काळ हिरवाई टिकवतो. नगरमधील शिर्डी रोडवरील नागापूर एमआयडीसी च्या मागे असणार्या साईबन कृषी पर्यटन केंद्रात उन्हाळ्याची सुट्टी संपत आल्यामुळे अनेक जण सहकुटुंब व ग्रुपने येत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे, निसर्गरम्य असणारे वातावरण तसेच झाडी व शुद्ध हवा यामुळे मन प्रसन्न राहते.येथे येणाऱ्या लोकांचे सध्या लालभडक गुलमोहर आकर्षण ठरत आहे. गुलमोहर हे झाड जगभरात निरनिराळ्या भौगोलिक परिस्थितीत बहरताना दिसत.समुद्रकिनारी असोत वा समुद्रसपाटीपासुन ह्जारो फूट उंचीपर्यंतचा डोंगराळ भाग असो तिथे दिसतो,लोकांचे निसर्ग आणि पर्यावरण रक्षण आणि संवर्धन यांकडे लक्ष वेधावे म्हणून आकर्षक अशा फुलांनी बहरलेला गुलमोहर प्रातिनिधिक वृक्ष समजला जातो,जमिनीकडे झेपावणाऱ्या फांद्यांमुळे गुलमोहराचा छत्रीसारखा घुमट तयार होतो. मे महिन्यात त्याला फुले येतात,गुलमोहोराच्या वैशिष्ट्यपूर्ण पाच लाल-केशरी पाकळ्यांवर पांढऱ्या-पिवळ्या रंगाच्या आकर्षक रेषा असतात अन् त्यामुळे या फुलाचे सौंदर्य अधिकच खुलते.

### साळुंके यांच्या अश्वत्थ डिझाईन स्टुडिओला ऐसा बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्ड

अहिल्यानगर (स. गांवकरी) : अहिल्यानगर येथील अश्वत्थ डिझाईन स्टुडिओचे आर्किटेक्ट रोहित साळुंके आणि सोनू साळुंके यांना ऐसा च्या नगरमधील कार्यक्रमात पुणे येथील चेलाराम हॉस्पिटलमधील लँडस्केप प्रोजेक्टसाठी ऐसा बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्ड 2026 ने सन्मानित करण्यात आले.बेस्ट डिझाइन औटसाईड अहिल्यानगर सिटी या विभागात या प्रकल्पाला द्वितीय पुरस्कार प्राप्त झाला. या प्रकल्पामध्ये वेलनेस सेंटरच्या टेरेस लँडस्केपचे नियोजन व डिझाईन करण्यात आले असून, शांत व सकारात्मक वातावरण निर्मितीवर विशेष भर देण्यात आला होता.आमदार संग्रामभैय्या जगताप यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.यावेळी ऐसाचे अध्यक्ष अभिजित देवि,सचिव भूषण पांडव,इंजि संजय चांदवले तसेच ऐसा चे सर्व पदाधिकारी, सदस्य व नगरकर उपस्थित होते. या यशाबद्दल अश्वत्थ डिझाईन स्टुडिओच्या टीमने क्लायंट,कन्सल्टंट,कॉन्ट्रॅक्टर तसेच प्रकल्पाशी संबंधित सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले आहेत.व त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मांडओहोळ धरण परिसरातील निर्बंधांमुळे पिके धोक्यात

## शेतकरी संकटात; विशेष अनुदानाची मागणी : राष्ट्रवादीचे नेते अमोल उगले यांचे प्रशासनाला निवेदन

पारनेर : (स. गांवकरी)

मांडओहोळ धरण परिसरात अचानक लागू करण्यात आलेल्या पाणी वापराच्या निर्बंधांमुळे कर्जुले हर्या, मानेवाडी, सावरगाव, काळेवाडी, गोडसेवाडी, शिंदेवाडी, गुरवेवाडी आणि वासुंदे या गावांतील शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. या निर्बंधांमुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने विशेष आर्थिक अनुदान द्यावे आणि जाचक निर्बंधांबाबत पुनर्विचार करावा, अशी मागणी निलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी व टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाचे नेते अमोल उगले यांनी पारनेरचे गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



या परिसरात शेतकरी मोठ्या प्रमाणावर टोमॅटो, मिरची यांसारख्या नगदी पिकांची लागवड करतात. यासाठी शेतकऱ्यांनी खते , बियाणे, औषधे, ठिबक सिंचन आणि मशागतीवर लाखो रुपयांची गुंतवणूक केली आहे. मात्र, प्रशासनाने कोणतीही पूर्वसूचना न देता पाणी उपशावर निर्बंध घातल्यामुळे उभ्या पिकांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. आधीच नैसर्गिक संकटे आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांचे या निर्णयामुळे कंबरडे मोडले आहे.

कोणतीही पूर्वसूचना न देता मांडओहोळ धरण परिसरात लागू केलेल्या निर्बंधांमुळे शेतकऱ्यांच्या कोट्यवधी रुपयांच्या गुंतवणुकीवर पाणी फिरण्याची भीती निर्माण झाली आहे. पिकांना पाणी न मिळाल्यास टोमॅटो, मिरचीची उभी पिके जळून खाक होतील. प्रशासनाने तातडीने पिकांचे पंचनामे करून विशेष अनुदान मंजूर करावे आणि या जाचक निर्बंधांचा पुनर्विचार करून बळीराजाला तातडीने दिलासा द्यावा, हीच आमची मागणी आहे.

**— अमोल उगले (नेते, टाकळी ढोकेश्वर जि. प. गट)**

प्रशासनाला निवेदन देण्यात आले यावेळी भोंद्रे गावचे सरपंच अभिजीत झावरे, वारणवाडीचे सरपंच संजय काशीद, सामाजिक कार्यकर्ते अशोक खैरे, निलेश पवार, युवराज पाटील खिलारी, सुरेश झावरे, ग्रामपंचायत सदस्य डॉ. आकाश झावरे, मा. सरपंच अनिल तांबडे, पियुष कोकाटे, सचिन वाफारे, मयूर आंधळे, विवेक शिंदे, देसवडे येथील संपत फटांगरे यांच्यासह मांडओहळ परिसरातील शेतकरी, निलेश लंके प्रतिष्ठान व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संबंधित विभागाने तातडीने पिकांचे पंचनामे करून शासनाकडे मदतीचा प्रस्ताव पाठवावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

## २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

ओतूर : (स. गांवकरी)

रविवार दि. १४ जून २०२६ रोजी ओतूर ज्येष्ठ नागरिक संघाची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संघाचे अध्यक्ष मा.रा.ज्ञा. डुंबरे यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या सभेसाठी पुणे प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष श्री. हनमंतकुमार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच उपाध्यक्ष मा. इनामदार, सचिव श्री. एकनाथ बोर्जे, तालुका समन्वय समितीचे अध्यक्ष प्रा. एकनाथ डोंगरे, सचिव श्री. नामदेव दिघे, उपाध्यक्ष प्रा. आसाराम सर, ज्येष्ठ मार्गदर्शक श्री. माळवे गुरुजी, श्री. ओतूरकर साहेब, श्री. वायकर साहेब व मुक्ताई संघाच्या अध्यक्षा सौ.सुंदराबाई डुंबरे यांची उपस्थिती लाभली. परिसरातील विविध संघांचे अध्यक्ष, सचिव तसेच महाराष्ट्र राज्य वारकरी साहित्य परिषदेचे तालुका अध्यक्ष ह.भ.प. गंगाराम महाराज डुबरे पाटील,



शरद सहकारी बँकेचे उपाध्यक्ष विनायकशेठ तांबे ,युवा नेतृत्व मोहितशेठ ढमाले,मा. जि.प. सदस्य ,खरेदी-विक्री संघाचे उपाध्यक्ष दिलीप डुंबरे पाटील व सारथी कारखान्याचे संचालक धनंजय डुबरे पाटील या मान्यवरांची उपस्थिती सभेचे वैशिष्ट्य ठरली. सभेचे प्रास्ताविक अध्यक्ष म्हणून सुतार सर यांची निवड करण्यात आली. रामदास ढमाले यांनी शोक प्रस्ताव मांडून दिवंगत एकनाथ डुंबरे यांना श्रद्धांजली वाहिली.संघाच्या नवीन कार्यकारिणीचा शपथविधी मा. ल. जाधवयांच्या हस्ते पार पडला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवीदास नाना तांबे यांनी केले.उपस्थितांचे आभार दत्तात्रय डुंबरे यांनी मानले.

## जिल्हा परिषद शाळा दापोडे येथे प्रवेशोत्सवाचा उत्साहात शुभारंभ

ठाणे : (स. गांवकरी)

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या शाळा प्रवेशोत्सवानिमित्त जिल्हा परिषद शाळा दापोडे भिवंडी येथे पहिल्या दिवसाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, टाळ्यांच्या गजरात आणि आनंदी वातावरणात स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाला ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी उपस्थित राहून नवागत विद्यार्थ्यांना स्वागत केले आणि त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर इयत्ता पहिलीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेशांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या आनंदात भर घालण्यासाठी गोड खाऊचेही वाटप करण्यात आले.



'पहिले पाऊल' या संकल्पनेअंतर्गत इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांच्या पावलांचे ठसे घेऊन त्यांच्या शैक्षणिक प्रवासाची संस्मरणीय नोंद करण्यात आली. तसेच 'मिशन भरारी' या अभिनव उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना इस्रोच्या शैक्षणिक सफरीचा अनुभव देण्यात आला. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी अवकाश संशोधन, उपग्रह निर्मिती, रॉकेट प्रक्षेपण यांसारख्या विषयांची माहिती घेतली तसेच शास्त्रज्ञांशी संवाद साधून विज्ञान आणि तंत्रज्ञानाविषयीची उत्सुकता वाढवली, याबाबत कौतुक करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव म्हणाले, "मी स्वतः जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेतले असून, याच शाळेने मला मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची प्रेरणा दिली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये अमर्याद क्षमता आहे. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण मेहनत आणि जिद्द यांच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते. प्रत्येक विद्यार्थ्याने आत्मविश्वासाने शिक्षण घेत आपले भविष्य घडवावे." त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, स्पर्धा परीक्षा आणि उच्च शिक्षणाबाबत विशेष उत्सुकता निर्माण झाली आहे. उपस्थित अधिकारी व मान्यवरांनीही विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांचे कौतुक केले आणि उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रवेशोत्सव कार्यक्रमाला माजी बांधकाम व आरोग्य समिती सभापती कुंदन पाटील, माजी नगरसेवक भरत पाटील, सरपंच संध्या पाटील, गटशिक्षणाधिकारी वैशाली डोंगरे, विस्तार अधिकारी आशिष झुंजारराव, जिल्हा समन्वयक (समावेशित शिक्षण) अनिल कुऱ्हाडे, मुख्याध्यापक अशोक पाटील तसेच शिक्षकवृंद, पालक, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शाळा प्रवेशोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण करण्याबरोबरच पालकांचा शाळेवरील विश्वास दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे नवागत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची आनंददायी सुरुवात झाली असून जिल्हा परिषद शाळांमधील गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा संदेश अधिक प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचला.

## नवीन प्रवेश सोहळा उत्साहात संपन्न



सर्वतिर्थ टाकेद : (स. गांवकरी)

प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, खडकेद येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभी नवीन विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आयोजित करण्यात आलेला प्रवेशोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात पार पडला. नवागत विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि पालकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण शाळा परिसर उत्सवमय झाला होता.

कार्यक्रमाची सुरुवात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागताने करण्यात आली. बैलगाडीत मिरवणूक काढत विद्यार्थ्यांचे औक्षण करून तसेच स्वागतगीताच्या माध्यमातून त्यांचे मनःपूर्वक स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करण्यात आली. इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेतलेल्या चिमुकल्यांना विशेष सन्मानाने शाळेत प्रवेश देण्यात आला. त्यांच्या स्वागतासाठी सेल्फी फोटो काढत पाऊलखुणा उमटवण्यात आल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. पालकांचेही पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. आपल्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात अशा आनंददायी वातावरणात होत असल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदिवासी विकास विभाग, नाशिक प्रकल्प कार्यालयातील मा. श्री. सुनिल राठोड साहेब उपस्थित होते. तसेच व्यासपीठावर माजी जिल्हा परिषद सदस्य केरू दादा खतेले, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष किसन भांगरे, पालक प्रतिनिधी काळू निरगुडे, माजी विद्यार्थी, ग्रामस्थ आणि इतर मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थ्यांना नियमित शाळेत उपस्थित राहण्याचे, चांगले शिक्षण घेण्याचे तसेच शिस्त, संस्कार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. पालकांनीही मुलांच्या शिक्षणासाठी सकारात्मक सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान नवागत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये दप्तर, पाठ्यपुस्तके, वह्या, पेन, पाटी तसेच इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचा समावेश होता. साहित्य प्राप्त झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण दिसून आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, यांनी विशेष परिश्रम घेतले. अखेरीस उपस्थित सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. "प्रत्येक बालक शाळेत, प्रत्येक बालक शिक्षणात" हा संदेश देत प्रवेशोत्सव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## विद्यार्थी दत्तक योजनेतून १५९ विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य



पुणे : (स. गांवकरी)

पुण्याच्या मानाच्या पहिल्या श्री कसबा गणपती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आणि श्री कसबा गणपती सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने गेली २३ वर्षे राबविण्यात येणाऱ्या विद्यार्थी दत्तक योजने अंतर्गत यावर्षी १५९ गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय शुल्क व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. हॉटेल सेंट्रल पार्क, शिवाजीनगर येथे झालेल्या या कार्यक्रमास कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. श्री. हेमंत रासने, मानाचा पहिला श्री कसबा गणपती मंडळाचे अध्यक्ष श्री. श्रीकांत शेटे तसेच शिक्षण समुपदेशक सौ. चैत्राली कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. या योजनेचा लाभ रमणबाग, हुजूरपागा, अहिल्यादेवी, नंदादीप, कर्वे संस्था, विमलाबाई गरवारे तसेच पुण्यातील इतर अनेक नामांकित शाळांमधील विद्यार्थ्यांना मिळाला.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना व पालकांना शिक्षणाचे महत्त्व, परिश्रम आणि सातत्य याविषयी मार्गदर्शन केले. शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी, त्यांचे पालक आणि शाळांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित होते.

# लोकहिताचे काम करणारे कार्यकर्तें हिच खरी पक्षाची ताकद

## आमदार काशिनाथ दातेंकडून कवाद दाम्पत्याचे कौतुक

पारनेर : (स. गांवकरी)

निघोज ता. पारनेर येथे कवाद दाम्पत्याच्या विशेष प्रयत्नांतून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या स्मार्ट कार्ड वाटप पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांचे शुभहस्ते झाले.

समाजातील महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य घटकांच्या हितासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते सर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्षा सौ. सुधामती विठ्ठल कवाद आणि विठ्ठल



कवाद यांचे जनकल्याणकारी व लोकाभिमुख उपक्रम राबविल्याबद्दल विशेष अभिनंदन केले. समाजातील गरजू घटकांपर्यंत विविध सुविधा पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असून, लोकहिताचा विचार करून कार्य करणारे कार्यकर्ते हे पक्षाची खरी ताकद आहे.

"राजकारण हे केवळ सत्तेसाठी नसून समाजसेवेचे प्रभावी माध्यम आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारे उपक्रम समाजाला नवी दिशा देतात. सुधामती कवाद आणि विठ्ठल कवाद यांनी राबविलेला हा उपक्रम निश्चितच अनुकरणीय असून अशा कार्यामुळे समाजात विश्वास आणि आपुलकीचे नाते अधिक दृढ होते."

या कार्यक्रमात शेकडो महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिकांना स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे आपल्या गावातच सबंधित स्मार्ट कार्डची सुविधा उपलब्ध झाल्याने उपस्थित नागरिकांमध्ये वेळ व मनस्तापातून मुक्तता मिळाल्याने समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून आयोजकांच्या कार्याचे निघोजसह परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे. यावेळी राष्ट्रवादी युवती प्रदेशाध्यक्षा संध्या सोनवणे, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष आर.एस. कापसे सर, ॲड. युवराज पाटील, ज्ञानूशेठ लंके, विठ्ठलराव कवाद, सुधामती कवाद, रोहिदास लामखडे, बाळासाहेब लामखडे, रमेश वरखडे, हिराभाऊ सोनवणे, पै. सुभाष वराळ, शरद ठुबे, यश शेटे, पृथ्वीराज कवाद, भास्करअण्णा उचाळे, संदीप कवाद, शांताराम कवाद, सोमनाथ वरखडे साहेब, विशाल साळवे, स्वराज कवाद आदी मान्यवरांसह महिला भगिनी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

"आमदार दाते सरांची जनतेशी असलेली बांधिलकी, विकासकामांची तळमळ आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांप्रती असलेली संवेदनशीलता ही आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या लोकाभिमुख कार्यपद्धतीतूनच प्रेरणा घेत आम्ही हा स्मार्ट कार्ड वाटपाचा जनकल्याणकारी उपक्रम राबविला आहे. दाते सर नेहमीच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सुविधा पोहोचविण्याचा प्रयत्न करतात, हीच त्यांची खरी ताकद आहे. जनतेच्या सेवेला प्राधान्य देणारे त्यांचे नेतृत्व आज पारनेर तालुक्यात विश्वासाचे प्रतीक बनले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अशाच लोकहिताच्या उपक्रमांद्वारे समाजसेवेचे कार्य अधिक व्यापक करण्याचा आमचा प्रयत्न राहील."

**– सौ. सुधामती विठ्ठल कवाद, जिल्हा कार्याध्यक्षा, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी.**

# थोडक्यात पण महत्वाचे

## दिव्यातील आर. एल. पी. शाळेत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव



ठाणे (स. गांवकरी) : दिव्यातील आर. एल. पी. शाळेत पहिल्याच्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांना गोड भेट देत नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यात आली. दिवा शहरातील मुंब्रादेवी कॉलनी येथील आर.एल. पी. शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात स्वागत करण्यात झाले. शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे शाळेतील शिक्षकांनी औक्षण करून त्यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या नव्या प्रवासासाठी शुभेच्छा देत त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. शाळेच्या प्रवेशद्वारासह परिसर आकर्षक सजावटीने सजविण्यात आला होता. शाळेच्या विश्वस्तांकडून विद्यार्थ्यांना गोड भेट देण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून पालकांनीही शाळेच्या या स्वागत उपक्रमाचे कौतुक केले. पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना आपुलकीची व प्रेमळ वागणूक मिळाल्याने त्यांचा शाळेबाबतचा उत्साह अधिक वाढलेला दिसून आला.

## बाळाच्या पचनसंस्थेत अडकलेली हेअरपिन काढून वाचवला जीव

पुणे (स. गांवकरी) : मणिपाल हॉस्पिटल, खराडी येथील डॉक्टरांनी दीड महिन्यांच्या बाळाच्या पचनसंस्थेत अडकलेली हेअरपिन तातडीच्या एंडोस्कोपिक प्रक्रियेद्वारे यशस्वीरित्या काढून संभाव्य गंभीर गुंतागुंत टाळली. घरी खेळत असताना चुकून हेअरपिन गिळल्यामुळे बाळाला घटनेनंतर सुमारे दोन तासांनी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तातडीने करण्यात आलेल्या पोटाच्या एक्स-रेमध्ये ही हेअरपिन पोटाच्या खालच्या भागात किंवा लहान आतड्याच्या सुरुवातीच्या भागात पोहोचल्याचे आढळून आले. हेअरपिन उघडी असल्याने पोट किंवा लहान आतड्याला छिद्र पडण्याचा धोका निर्माण झाला होता. त्यामुळे या प्रकरणाकडे वैद्यकीय आणीबाणी म्हणून पाहण्यात आले. विशेष प्रकारच्या टूथ फोर्सेप्सच्या साहाय्याने ही हेअरपिन पचनसंस्थेला कोणतीही इजा न होता यशस्वीरित्या बाहेर काढण्यात आली.

## टोयोटाने सादर केली इनोव्हा क्रिस्टा




बेंगळुरू (स. गांवकरी) : टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज भारतातील सर्वाधिक लोकप्रिय एमपीवी नवी इनोव्हा क्रिस्टा लॉन्च करण्याची घोषणा केली. नव्या बोल्ड डिझाइन एलिमेंट्स आणि अतिरिक्त सोयीसुविधांसह ही गाडी ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. टोयोटाची "एव्हर बेटर कार्स" फिलॉसफी आणि मजबूत कस्टमर-फर्स्ट अप्रोच यानुसार, हे नवीन अपग्रेड बदलत्या ग्राहक गरजा लक्षात घेऊन काळजीपूर्वक तयार करण्यात आले आहे. त्यामुळे लाखो भारतीय कुटुंबांसाठी विश्वासार्ह मोबिलिटी पार्टनर म्हणून इनोव्हा क्रिस्टाचा वारसा अधिक मजबूत होणार आहे. दोन दशकांहून अधिक काळाच्या अपराजित आणि अद्वितीय प्रवासातून घडलेली इनोव्हा क्रिस्टा आजही भारतातील सर्वाधिक लोकप्रिय एमपीवी म्हणून ओळखली जाते. विश्वासार्हता, आराम, सुरक्षितता, लक्झरी आणि पॉवर यामुळे ती ग्राहकांची पहिली पसंती ठरली आहे. या मजबूत पायावर आधारित, नवी इनोव्हा क्रिस्टा टोयोटाच्या सतत सुधारणा करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. निवडक ग्रेड्समध्ये उपलब्ध अतिरिक्त फीचर्ससह, कार्यक्षमतेचे आणि सौंदर्याचे विचारपूर्वक केलेले संयोजन ग्राहकांना अधिक उंचावलेला ड्रायव्हिंग अनुभव देण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे.

## आयकॉनिक 'क्लासिक वर्ल्डटायमर मॅन्युफॅक्चर' सह फादर्स डे साजरा



पुणे (स. गांवकरी) : या फादर्स डे निमित्त, फ्रेडरिक कॉन्स्टंट आपल्या नव्याने लाँच केलेल्या क्लासिक वर्ल्डटायमर मॅन्युफॅक्चर घड्याळाच्या माध्यमातून कारागिरी, अचूकता आणि परंपरेच्या मूल्यांवर विशेष प्रकाश टाकत आहे. २०१२ मधील लाँचिंगपासून हे या मेझॉनच्या प्रमुख मॉडेल्सपैकी एक राहिले आहे. या टाइमपीसमध्ये (घड्याळात) आता नवीन मॅन्युफॅक्चर एफसी -719 मुव्हमेंट, वाढीव ७२ तासांचा पॉवर रिझर्व्ह, आकर्षक ४० मिमी केस आणि तारीख नसलेले सुटसुटीत डायल समाविष्ट करण्यात आले आहे. फ्रेडरिक कॉन्स्टंटच्या स्वतःच्या कार्यशाळेत (वर्कशॉप) विकसित, असेंबल आणि रेग्युलेट करण्यात आलेली एफसी -719 ही मुव्हमेंट, १९८८ नंतरची मेझॉनची ३५ वी मॅन्युफॅक्चर मुव्हमेंट ठरली आहे. हे अद्ययावत क्लासिक वर्ल्डटायमर मॅन्युफॅक्चर मेकॅनिकल इनोव्हेशन आणि आधुनिक डिझाइनचा मेळ घालत एकाच वेळी सर्व २४ टाइम झोन दर्शवण्याचे आपले वैशिष्ट्य पुढे चालू ठेवत आहे. आज सर्व कुटुंबे वडिलांचा सन्मान करत त्यांच्या अखंड प्रभावाचा उत्सव साजरा करत असताना, हे क्लासिक वर्ल्डटायमर मॅन्युफॅक्चर पिढ्यानपिढ्या चालत आलेली शाश्वत मूल्ये, सूक्ष्म कारागिरी आणि उत्कृष्टतेचा ध्यास यांना दिलेली एक अनोखी मानवंदना आहे.

## विचारपूर्वक निवडलेल्या फादर्स डे भेटवस्तू – नेहमीच्या पर्यायांपलीकडे




पुणे (स. गांवकरी) : वडील आपल्या आयुष्यात दररोज एका खास पद्धतीने साथ देत असतात. मदतीसाठी सर्वप्रथम पुढे येणारे, स्वतःसाठी काहीही न मागणारे आणि कोणत्याही परिस्थितीत ज्यांच्यावर आपण विश्वास ठेवू शकतो असे ते असतात. त्यांची काळजी घेण्याची पद्धत शांत, सातत्यपूर्ण आणि कायमसोबत असणारी असते. या फादर्स डे निमित्त त्यांना अशा भेटवस्तू द्या ज्या विचारपूर्वक निवडलेल्या, उपयुक्त आणि वैयक्तिक वाटतील. भव्य भेटवस्तू नव्हे, तर रोजच्या आयुष्यात थोडा अधिक आनंद आणि सोय आणणारे छोटेसे बदल. कारण फादर्स डे हा फक्त भेटवस्तू देण्याचा दिवस नाही. तर त्यांनी आपल्या आयुष्यासाठी केलेल्या त्या असंख्य छोट्या गोष्टींसाठी त्यांचे आभार मानण्याची एक संधी आहे, ज्या ते अनेकदा कोणत्याही अपेक्षेशिवाय करत असतात. आणि Nykaa च्या खास निवडलेल्या कलेक्शनमुळे त्यांच्यासाठी परफेक्ट भेटवस्तू शोधणे आता अधिक सोपे झाले आहे. त्यांच्या ग्रूमिंग रुटीनमध्ये Anua Heartleaf Quercetinol Pore Deep Cleansing Foam आणि Nykaa Wanderlust Mediterranean Sea Salt Fresh Perfume Body Wash सारख्या उत्पादनांसह एक छोटासा अपग्रेड असो, Prada L'Homme Eau de Toilette किंवा RALPH LAUREN Cologne Intense Eau De Toilette For Him यांसारख्या सुगंधांमधून त्यांना त्यांचा नवा सिग्नेचर फ्रॅग्रन्स शोधण्यास मदत करणे असो, किंवा La Roche-Posay Anthelios UVMUNE400 Invisible Fluid SPF50+ आणि Aestura Atobarrier365 Cream यांच्या मदतीने त्यांची स्किनकेअर रुटीन अधिक सोपी करणे असो — या सर्व विचारपूर्वक निवडलेल्या भेटी त्यांच्या दैनंदिन आयुष्याचा सहज भाग बनण्यासाठी डिझाइन करण्यात आल्या आहेत.

# जिद्द, मेहनत, चिकाटीने अभ्यास करा – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत महापालिका शाळा क्र. २३ मधील विद्यार्थ्यांनी साजरा केला प्रवेशोत्सव

ठाणे: (स. गांवकरी)



गुलाबपुष्प, नवी कोरी पुस्तक, खाऊ आणि मुलांनी शाळेत पहिलं पाऊल टाकत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शाळा क्र. 23 च्या विद्यार्थ्यांनी शाळेत प्रवेश केला. आज ठाणे महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये पदाधिकारी, अधिकारी यांच्या उपस्थितीत शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना जिद्द, मेहनत, चिकाटीने अभ्यास करा तुम्ही निश्चितच पुढे जाल असा मोलाचा सल्ला दिला.

ठाणे महानगरपालिका शाळा क्र. 23 किसननगर येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महापौर शर्मिला पिंपळोलकर, शिवसेना गटनेते पवन कदम नगरसेवक राम रेपाळे, नगरसेविका संध्या मोरे, सुखदा मोरे, एकता भोईर, डॉ. दर्शना भोईर, महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, उपआयुक्त डॉ. मिताली संचेती, सहायक आयुक्त राजेश सोनावणे, शिक्षणाधिकारी शेषराव बढे, माजी नगरसेवक डॉ. जितेंद्र वाघ, शिक्षक सेनेचे पदाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक दीपक मोराणकर यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. उन्हाळ्याची सुट्टी संपून आज शाळा सुरू होत आहेत, मी विद्यार्थ्यांना भेटायला आलो असून शाळा ही आपल्या भविष्याची दारे आहेत. आई वडील आपल्याला जन्म देतात, पण शिक्षक आकार देण्याचं काम करतात. नवीन शाळेत आनंद तर असतोच पण टेन्शन पण असते, परंतु टेन्शन न घेता बिनधास्तपणे अभ्यास करा असा सल्ला राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विद्यार्थ्यांना दिला. एखादा विषय समजला नाही तर शिक्षकांना परत परत प्रश्न विचारा, जो प्रश्न विचारतो तो हुशार विद्यार्थी असतो, जिद्द, मेहनत, चिकाटीने अभ्यास करा, आपण निश्चितच पुढे जाल असेही त्यांनी सांगितले. यावेळी विद्यार्थी ही उपमुख्यमंत्री यांचे मार्गदर्शन लक्षपूर्वक ऐकत दाद देत होते. विद्यार्थी ही देशाची संपत्ती आहे, त्यांना आकार देण्याचे, सुजाण नागरिक घडविण्याचे काम हे शिक्षकांचे आहे. मातृभाषेतील शिक्षणाने विद्यार्थ्यांची आकलनशक्ती वाढते. शिक्षक देखील टेक्नोसॅव्ही झाले आहे, त्यामुळे स्पर्धात्मक युगात शिक्षकांनी विद्यार्थ्यांना जे नवीन आहे अशी माहिती दिली पाहिजे अशा सूचना त्यांनी शिक्षकांना दिल्या. शाळा तसेच शाळेचा परिसर स्वच्छ असला पाहिजे, पिण्याचे पाणी तसेच स्वच्छतागृह स्वच्छ असली पाहिजेत हे तपासण्यासाठी शाळांमध्ये व्हिजीलन्स स्कॉड पाठविण्याच्या सूचना त्यांनी महापालिका आयुक्त सौरभ राव यांना दिल्या. जर काही त्रुटी असतील तर त्या दूर करा, सर्व सुखसोई विद्यार्थ्यांना मिळाल्या पाहिजेत असेही त्यांनी सांगितले. महापालिका, जिल्हा परिषद किंवा सरकारी शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी न्यूनगंड बाळगू नये, देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, माजी राष्ट्रपती डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम, शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर या मोठ्या व्यक्तीही सरकारी शाळांमधून शिकले आहेत. शिक्षणाची गुणवत्ता आणि शिक्षकांची बांधिलकी महत्त्वाची असून शाळेच्या नावावरून भेदभाव करू नये, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नमूद केले. मी सुद्धा किसननगर शाळा क्र. 23 चा विद्यार्थी आहे, मला या शाळेचा सार्थ अभिमान आहे असे सांगत उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी शाळेच्या आठवणी जागवल्या. त्यावेळी रघुनाथ परब, निकम सर, राऊत बाई आम्हाला होत्या, त्यांची आज आठवण होते, पूर्वी ही शाळा म्हणजे चाळ होती. त्याला दरवाजे नव्हते. आम्ही साफसफाई करुन शाळेत बसायचो, याचा वेगळा आनंद होता. महापौर शर्मिला पिंपळोलकर या देखील याचा शाळेच्या माजी विद्यार्थींनी आहेत, मनपा शाळेत शिक्षण घेतलेले विद्यार्थी आज अनेक मोठ्या पदावर काम करत आहेत असे त्यांनी यावेळी नमूद केले.

यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे शाळा क्र. 46 येथे, शाळा क्र.18 येथे खासदार नरेश म्हस्के, शाळा क्र. 85 खर्डीपाडा दिवा येथे डॉ. श्रीकांत शिंदे, ठामपा शाळा क्र. 69 मध्ये आमदार संजय केळकर, शाळा क्र. 13 येथे, शाळा क्र. 100 येथे आमदार जितेंद्र आव्हाड, शाळा क्र. 91 येथे आमदार राजेश मोरे, आमदार ॲड माधवी नाईक या श्रीरंग शाळा येथे, सरस्वती सेकंडरी स्कूल येथे आमदार ॲड निरंजन डावखरे, उपमहापौर कृष्णा पाटील, शाळा क्र. 120 मध्ये सभागृह नेते हणमंत जगदाळे, शाळा क्र. 40 येथे विरोधी पक्ष नेते शानू पठाण हे उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत गुलाबपुष्प देवून त्यांचे स्वागत करुन प्रवेशोत्सव साजरा केला.

# चारा-पाणीटंचाईने शेतकरी हवालदिल

खोडद : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्याच्या पूर्व भागात सध्या भीषण पाणी आणि चारा टंचाई निर्माण झाली आहे. वाढत्या उन्हामुळे तालुक्यातील विहिरी, पाझर तलाव आणि कूपनलिका कोरड्या पडल्या असून भूजल पातळी कमालीची खाली गेली आहे. यामुळे शेतकरी आणि पशुपालक हवालदिल झाले आहेत. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात, टँकरच्या फेऱ्या वाढवाव्यात आणि दीर्घकालीन जलसंधारण व उपाययोजना राबवाव्यात अशी एकमुखी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. पेमदरा, शिंदेवाडी, नळवणे यांसारख्या गावांमध्ये पाण्याचे सर्व नैसर्गिक स्रोत आटल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बिकट झाला आहे.



अनेक गावांना सध्या टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे. या बिकट परस्थितीत पै.सोपानराव कणसे युवा प्रतिष्ठान आणि क्रिएटिव्ह ग्लोबल फाउंडेशनच्या अध्यक्षा तथा जिल्हा परिषद सदस्या स्मिता कणसे यांच्या वतीने स्वतःचा टँकर मोफत सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे काही प्रमाणात दिलासा मिळत असला तरी वाढत्या गरजांच्या तुलनेत तो अपुरा ठरत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. पावसाअभावी हिरव्या चाऱ्याचे उत्पादन थांबले आहे. बाजारात मिळणारा चारा अत्यंत महाग असल्याने पशुपालकांना तो परवडत नाहीये. परिणामी दुध उत्पादनातही लक्षणीय घट झाली असून पशुपालन व्यवसाय अडचणीत सापडला आहे. जनावरे जगवायची कशी, असा प्रश्न सध्या शेतकऱ्यांसमोर आहे.

# नैसर्गिक तेजासाठी त्वचेला आवश्यक असलेले ६ पोषक घटक

(स. गांवकरी)



कोणत्याही सौंदर्य विभागातून फिरताना तुम्हाला इन्स्टंट ग्लोचे आश्वासन देणारे सिरम्स, फेस मास्क्स आणि ओव्हरनाईट क्रीम्स यांची भरमार दिसते. मात्र, कोणताही क्लिनिकल न्यूट्रिशनिस्ट सांगेल की त्वचा ही केवळ शरीरात आत काय घडते याचे प्रतिबिंब असते. खराब आहाराला केवळ स्किनकेअरने संतुलित करता येत नाही. जेव्हा शरीराला आवश्यक सूक्ष्म पोषक घटकांची कमतरता भासते, तेव्हा त्याचे परिणाम थेट चेहऱ्यावर दिसतात— निस्तेजपणा, कोरडेपणा किंवा लवकर येणाऱ्या सूक्ष्म सुरकुत्यांच्या स्वरूपात.

रात्री चेहरा धुतल्यावरही नाहीशी न होणारी, नैसर्गिक आणि चिरकाल टिकणारी त्वचा-कांती मिळवण्यात तुम्हाला मदत करण्यासाठी, 'मॅक्स हेल्थकेअर'च्या आहारशास्त्र विभागाच्या प्रादेशिक प्रमुख रितिका समाद्दार अशा सहा मूलभूत पोषक घटकांची माहिती देत आहेत, जे तुमच्या त्वचेला अगदी पेशींच्या पातळीपासून पोषण देतात:

1. व्हिटॅमिन ई: व्हिटॅमिन ई हे एक फॅट-सोल्युबल अँटीऑक्सिडंट आहे. हे प्रदूषण आणि UV (अल्ट्राव्हायोलेट) एक्सपोजरमुळे होणाऱ्या ऑक्सिडेटिव्ह नुकसानापासून त्वचेच्या पेशींचे संरक्षण करते. हे पेशी पातळीवर ओलावा टिकवून ठेवण्याचे काम करते, ज्यामुळे त्वचा भरदार (plump) आणि लवचिक (resilient) राहते. कॅलिफोर्निया बदाम हे आहारातील व्हिटॅमिन ईचे सर्वात समृद्ध स्रोत आहेत, आणि काही बदाम रोजच्या गरजेचा मोठा भाग पूर्ण करतात, तेही शरीर चांगल्या प्रकारे शोषू शकणाऱ्या स्वरूपात. हे सवयीत आणण्याचा एक सोपा मार्ग म्हणजे त्यांना तुमच्या सकाळच्या स्मूदीमध्ये टाकणे किंवा घराबाहेर जाण्यापूर्वी तुमच्या सिरीयलवर भुरभुरवणे.

2. व्हिटॅमिन सी: कोलेजन हेच त्वचा घट्ट आणि लवचिक ठेवते, आणि व्हिटॅमिन सी शरीराला ते तयार करण्यासाठी आवश्यक असते. हे वेळोवेळी हायपरपिग्मेंटेशन कमी करण्यासही मदत करते, ज्यामुळे निस्तेज त्वचा हळूहळू उजळते. आवळा, सिट्रस फळे आणि शिमला मिरची हे दररोज ही गरज पूर्ण करण्याचे सर्वात विश्वासार्ह स्रोत आहेत.

3. ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स: हे हेल्दी फॅट्स त्वचेचा लिपिड बॅरियर तयार करतात, जो ओलावा आत ठेवतो आणि त्रासदायक घटक बाहेर ठेवतो. ओमेगा-३ कमी असलेला आहार अनेकदा कोरडी, सोलणारी किंवा सूज आलेली त्वचा म्हणून दिसून येतो. फ्लॅक्ससीड्स, बदाम आणि चिया सीड्स हे वनस्पती-आधारित व्यावहारिक स्रोत आहेत, जे दैनंदिन जेवणात सहज समाविष्ट करता येतात.

4. झिंक: झिंक त्वचेतील तेलाचे (oil) उत्पादन नियंत्रित करते आणि त्वचेच्या खोल थरांमध्ये पेशींची दुरुस्ती करण्यास मदत करते, त्यामुळे ते अनेकदा स्वच्छ त्वचा आणि कमी पिंपल्सशी संबंधित मानले जाते. हरभरा आणि संपूर्ण धान्ये हे या सूक्ष्म खनिजाचे चांगले दैनंदिन स्रोत आहेत.

5. बीटा-कॅरोटीन: हे व्हिटॅमिन एचे पूर्वरूप (precursor) आहे. बीटा-कॅरोटीन त्वचेतील पेशींच्या नूतनीकरणाला (skin cell turnover) चालना देते, ज्यामुळे मृत पेशी साचल्यामुळे येणारा निस्तेजपणा टाळता येतो. हे त्वचेच्या रंगाला सौम्य आणि निरोगी उबदारपणा (warmth) देखील देते. गाजर, रताळे आणि पालक हे याचे सर्वात सहज उपलब्ध आणि परवडणारे स्रोत आहेत, जे नियमितपणे आहारात समाविष्ट करता येतात.

6. बायोटिन: बायोटिन बहुतेक वेळा केसांच्या आरोग्यासोबत जोडले जाते, पण त्याचे फायदे त्वचेसाठीही तितकेच महत्त्वाचे आहेत. हे त्वचेतील फॅटी ॲसिड मेटाबॉलिझम टिकवून ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.

# आंबेडकरवादी साहित्य संमेलनात रंगली काव्यपौर्णिमा

नांदेड : (स. गांवकरी)



नांदेड येथील सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने दरमहा येणाऱ्या पौर्णिमेचे औचित्य साधून काव्यपौर्णिमा हा कविसंमेलनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. आता मी काव्यपौर्णिमा शतकापार गेली असून गेल्या नऊ वर्षांपासून सुरू असलेली या महिन्यातील १०७ वी काव्यपौर्णिमा नुकत्याच पार पडलेल्या २१ व्या आंबेडकरवादी साहित्य संमेलनात ख्यातकीर्त विद्रोही कवी नितीन चंदनशिवे यांच्या उपस्थितीत संपन्न झाली यावेळी कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध कवयित्री ज्योती परांजपे ह्या होत्या तर विद्रोही कवी विवेक मवाडे, कॉ. डॉ आदिनाथ इंगोले, यवतमाळ येथील सुप्रसिद्ध कवयित्री अर्चना खोब्रागडे, साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा काव्यपौर्णिमेचे संकल्पक प्रज्ञाधर ढवळे, साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, नागोराव डोंगरे, मारोती कदम, कैलास धुतराज, मुख्य संयोजक गणेश शिंगे, संयोजन समितीचे अध्यक्ष उन्मेश ढवळे, निमंत्रक जी. पी. मिसाळे आदींची उपस्थिती होती.

सत्यशोधक विचार मंच आणि मनपा कामगार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात २१ व्या आंबेडकरवादी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात विद्रोही कवी नितीन चंदनशिवे यांच्या उपस्थितीत सप्तरंगी साहित्य मंडळाची १०७ वी काव्यपौर्णिमा रंगली यात संभाजी खंडागळे, प्रा. सुनीलचंद्र सोनकांबळे, रुपाली वागरे वैद्य, प्रतिभा पांडे, भाग्यश्री आसोरे, अलका मुगटकर, ज्योती पतिंगराव, सुजाता पोपुलवार, सावित्री शेवाळकर, उषाताई ठाकूर, बालिका बरगळ, मा. ह. देशमुख उंचेगांवकर, आ. ग. ढवळे, डी. एन. मोरे खैरकेकर, जीवन मांजरमकर, प्रकाश ढवळे नागलगांवकर, राहुल वाडे, शिवाजी गोडबोले, शंकर माने, अशोक कुबडे, गजानन हिंगमिरे, साईनाथ रहाटकर, थोरात बंधू, दत्ताहरी कदम, धर्मश्री लोणे आदी कवी कवयित्रींनी सहभाग नोंदविला.

लोकशाही मूल्ये, विषमता, संघर्ष, सामाजिक वास्तव आणि परिवर्तनाच्या भावनांना शब्दरुप दिले. १०७ वी काव्यपौर्णिमा ऐतिहासिक आणि संस्मरणीय ठरली. सहभागी कवी कवयित्रींना सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने काव्यवाचन केल्याबाबतचे प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले.

काव्यपौर्णिमेचे प्रास्ताविक प्रज्ञाधर ढवळे यांनी केले. सूत्रसंचालन मुळावा येथील कवी सज्जन बरडे यांनी केले तर आभार राज गोडबोले यांनी मानले. संमेलनाच्या यशस्वीतेसाठी कोंडदेव हाटकर, श्रावण नरवाडे, प्रभू ढवळे, लालबाजी घाटे, विजय गोणारकर, राहुल गवारे, शनिदास वाघमारे, एन. टी. पंडित, रमेश कांबळे, संजय जाधव, एम. डी. जोंधळे, आर. पी. झगडे, रमेश कसबे, शोभा कोकरे, गंगाधर धडेकर, रंजिता गजभारे, अर्चना गवारे, पी. के. खानापूरकर, सुमेधा हाटकर आदींनी परीश्रम घेतले. कविसंमेलनाला विचारवंत, स्री पुरुष काव्यरसिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# नव्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण




खोडद : (स. गांवकरी)

नगदवाडी ता.जुन्नर येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळेत शैक्षणिक वर्ष 2026/27 च्या पहिल्याच दिवशी इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना पाठ्यपुस्तके,शालेय गणवेश, शैक्षणिक साहित्य,खाऊ,गुलाबपुष्प व फुगे देऊन स्वागत करण्यात आले.अशी माहिती शाळेच्या मुख्याध्यापिका उज्वला बोऱ्हाडे यांनी दिली. कार्यक्रमाच्या निमित्ताने पुणे जिल्हा परिषद पुणेच्या सदस्या कल्पनाताई वैभवकुमार काळे, नगदवाडी केंद्राच्या केंद्रप्रमुख वनिता हांडे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिनेश बढे,शाळा सल्लागार समिती अध्यक्ष सुरेश बढे,नगदवाडी विविध कार्यकारी सोसायटी अध्यक्ष पोपटराव बढे,शाळा व्यवस्थापन समिती सदस्या संगीता बढे,दिपाली जाधव,रघुनाथ बढे,दिनेश कुतळ, विकास बढे,दिनेश घाडगे,दयानंद बढे,संतोष बढे,बाबाजी बढे,संकेत कुतळ आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन मंगेश मेहेर,पंडित चौगुले,निलेश शेलार,विद्या वाघ,आशा आरेकर व उज्वला कांबळे या शिक्षकांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश मेहेर यांनी केले तर आभार निलेश शेलार यांनी मानले.

# वूमन इन ब्ल्यूच्या प्रवासा मागील माईल्स ॲन्ड मोमेंटम साजरा

पुणे : (स. गांवकरी)




'हर सफर में दम है' या शक्तीशाली मोहिमेला अनुसरुन अपोलो टायर्स या भारतीय राष्ट्रीय क्रिकेट टिमचे प्रमुख प्रायोजक असलेल्या कंपनी तर्फे आता नवीन अध्याय सुरु करत महिलांच्या वर्ल्ड कपच्या आधी त्यांच्या प्रोत्साहक अशा प्रवासावर प्रकाश टाकण्याच्या उद्देशाने नवीन चित्रपट सुरु करणार आहे. ही मोहीम खेळाडूंच्या कठीण आणि अनेकदा नजरेआड राहणाऱ्या प्रवासांचा गौरव करण्याच्या त्याच भावनेला पुढे नेते, ज्याचा आधार एक हृदयस्पर्शी आणि सिनेमॅटिकदृष्ट्या प्रभावी चित्रपट आहे. हा चित्रपट राष्ट्रीय आयकॉन्स हरमनप्रीत कौर, स्मृती मंधाना, जेमिमा रॉड्रिग्स, शफाली वर्मा आणि रेणुका यांनी जागतिक स्तरावर ओळख मिळवण्यापूर्वी पार केलेल्या शांत, खडतर आणि अनेकदा एकाकी वाटचालींचे अत्यंत जवळून चित्रण करतो. हा चित्रपट एका हृदयाला भिडणाऱ्या मूळ संगीतबद्ध ध्वनिमुद्रिकेवर आधारित आहे, जी त्यांच्या वैयक्तिक प्रवासांतील भावनिक भार आणि अंतिम विजय प्रभावीपणे व्यक्त करते. हा चित्रपट या विजेत्या खेळाडूंच्या घडणाऱ्या सुरुवातीच्या काळाचा सखोल वेध घेतो. त्यांच्या यशामागील वेगळे संघर्ष आणि कधीही हार न मानणारी जिद्द यात दाखवली आहे.

# राजूर ग्रामपंचायतीत भूकंप : सरपंच पुष्पा निगळे अपात्र, सव्वा कोटींच्या गैरव्यवहाराचा ठपका!

राजूर : (स. गांवकरी)



अकोले तालुक्यातील राजूर ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. पुष्पा दत्तात्रय निगळे यांना विभागीय आयुक्तांनी तात्काळ प्रभावाने सरपंच आणि सदस्य पदावरून अपात्र केले आहे. सन २०२३-२४ आणि २०२४-२५ मधील विकासकामांच्या निधीत गंभीर गैरव्यवहार केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

बातमीचे मुख्य मुद्दे: दणका कोणाचा: नाशिक विभागाच्या अपर आयुक्त सारिका दिलीप बारी यांचा आदेश. एकूण घोटाळा/अनियमितता: ₹१,१४,८९,५५१/- (१ कोटी १४ लाख ८९ हजार ५५१ रुपये). मुख्य आरोप: १५ वा वित्त आयोग, ग्रामनिधी , पाणीपुरवठा आणि पेसा (PES A) निधीच्या वापरामध्ये वित्तीय नियमांचे उल्लंघन व शासकीय कपाती न करणे.

कायदेशीर कलम : महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम ३९(१) नुसार कारवाई.

सामाजिक कार्यकर्त्यांचा पाठपुरावा: राजूर ग्रामपंचायतीमधील या सर्व आर्थिक गैरव्यवहारांचा आणि भ्रष्टाचाराचा सामाजिक कार्यकर्ते श्री. संतोष मुतडक यांनी प्रशासनाकडे सातत्याने व भक्कमपणे पाठपुरावा केला होता, ज्याची परिणती अखेर या मोठ्या कारवाईत झाली आहे.

ग्रामसभेचा आक्रमक पवित्रा: २९ मे २०२६ रोजी झालेल्या विशेष ग्रामसभेत गावकऱ्यांनी सरपंच व सर्व सदस्यांनी राजीनामे द्यावेत असा ठराव एकमुखाने मंजूर केला होता.

सध्याची स्थिती: ग्रामसभेच्या ठरावानंतरही एकाही लोकप्रतिनिधीने राजीनामा दिलेला नाही. सव्वा कोटींच्या या कथित घोटाळ्यात आता विभागीय आयुक्तांच्या आदेशानंतर प्रशासन पदभार हस्तगत करण्यासाठी काय पावले उचलणार आणि संबंधित दोषींवर पोलिसांत फौजदारी गुन्हा (FIR) कधी दाखल होणार? याकडे संपूर्ण अकोले तालुक्याचे लक्ष लागले आहे.